cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२८० | शनिवार दि.७ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ममता बॅनर्जी यांचा टोकाचा विरोध

भारताच्या न्यायालयीन इतिहासात बुधवारी प्रथमच एक सनसनाटी घटना घडली आहे. एका राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर असलेल्या व्यक्तीने सर्वोच्च न्यायालयात स्वत: युक्तीवाद केला आहे. हे प्रकरण आहे पश्चिम बंगालमधील मतदारसूची पुनर्सर्वेक्षण अभियानाचे किंवा एसआयआरचे आणि या व्यक्ती आहेत, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी.

# तेलबिया उत्पादनात ऐतिहासिक वाढ

## खाद्यतेल आत्मनिर्भरतेच्या दिशेने भारताची ठोस वाटचाल



**पुणे । प्रतिनिधी**

**देशांतर्गत तेलबिया उत्पादनाला चालना देण्यासाठी आणि खाद्यतेलाच्या बाबतीत आत्मनिर्भर भारत साध्य करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी राष्ट्रीय खाद्यतेल–तेलबिया अभियानाला मंजुरी दिली होती. या अभियानाच्या अंमलबजावणीनंतर अवघ्या एका वर्षात तेलबिया क्षेत्रात सकारात्मक आणि उत्साहवर्धक चित्र दिसून येत आहे.**


कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या अंतिम अंदाजानुसार, तेलबिया लागवडीखालील क्षेत्रात वाढ झाली आहे. २०२३–२४ मध्ये ३०१.९२ लाख हेक्टर असलेले क्षेत्र २०२४–२५ मध्ये वाढून ३०४.४० लाख हेक्टरवर पोहोचले आहे. यामुळे शेतकऱ्यांचा तेलबिया पिकांकडे वाढलेला कल आणि शासनाच्या धोरणांवर वाढलेला विश्वास स्पष्ट होत आहे.क्षलागवडीसोबतच उत्पादनातही लक्षणीय वाढ नोंदवली गेली आहे. २०२३–२४ मध्ये ३९६.६९ लाख टन असलेले तेलबियांचे उत्पादन २०२४–२५ मध्ये थेट ४२९.८९ लाख टनांपर्यंत वाढले आहे. ही वाढ देशांतर्गत उत्पादन क्षमतेत झालेल्या सुधारणा, सुधारित बियाणे, आधुनिक कृषी पद्धती आणि शासनाच्या आर्थिक पाठबळाचे फलित मानली जात आहे. राष्ट्रीय खाद्यतेल–तेलबिया अभियानाअंतर्गत शेतकऱ्यांना वाजवी दर मिळावेत, बाजारातील चढ–उतारांपासून संरक्षण मिळावे आणि तेलबिया लागवड आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरावी, यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. विशेषतः किमान ▶▶ पान २ वर

# महापौर निवडणुकांत भाजपची सरशी

## राज्यातील आतापर्यंत आठ महापालिकांच्या चाव्या हातात

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील विविध महापालिकांमधील महापौर आणि उपमहापौर निवडणुकांत भाजप व महायुतीने सात ठिकाणी विजय मिळवला आहे. पिंपरी–चिंचवड, अमरावती, नागपूर, जळगाव, धुळे, छत्रपती संभाजीनगर आणि सोलापूर या शहरांत भाजपचे उमेदवार सत्तेत आले आहेत. काही ठिकाणी युती आणि बिनविरोध निवडीमुळे सत्ता स्थापनेचा मार्ग सोपा झाला. नागपूरमध्ये महापौर व उपमहापौर दोन्ही पदे भाजपकडे गेली, तर पिंपरी–चिंचवड आणि सोलापूरमध्ये बिनविरोध निवड झाली. या निकालांमुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपचे वर्चस्व वाढल्याचे चित्र दिसत आहे.**



अमरावती महानगरपालिकेत महापौरपदी भाजपा महायुतीचे श्रीचंद तेजवानी यांची निवड झाली आहे. भाजपच्या महापौरपदाच्या उमेदवाराला एमआयएमच्या बडनेरामधील महिला नगरसेविका मीरा कांबळे यांनी पाठिंबा दिला. अमरावतीमध्ये भाजप, युवा स्वाभिमान, शिंदेंची शिवसेना आणि अजित दादांची राष्ट्रवादी एकत्र आली आहे. जळगाव महापालिकेत महापौरपदासाठी भाजपच्या दीपमाला काळे यांची निवड झाली असून त्यांनी पदभार स्वीकारला आहे. ''महापालिकेत महापौर होत असल्याचा आनंद असताना दुसरीकडे जळगाव शहराची मोठी जबाबदारी असून या खुर्चीला कसा न्याय देता येईल असे प्रयत्न माझे राहणार आहेत. अशी प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली. पिंपरी–चिंचवड शहराच्या सत्तावीसाव्या महापौरपदी भाजपचे रवि लांडगे यांची आज (शुक्रवारी) बिनविरोध निवड झाली आहे. दोनवेळा नगरसेवक म्हणून बिनविरोध निवडून आलेले रवि लांडगे हे महापौरही बिनविरोध ▶▶ पान २ वर

# अजून २५ वर्षे शिल्लक

## ●पीएम मोदींचे सुचक वक्तव्य

**दिल्ली । वृत्तसंस्था**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी परीक्षा पे चर्चामध्ये विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी काही राजकीय सुतोवाच देणारी वक्तव्ये देखील केली. मोदींनी विद्यार्थ्यांना गेल्या काळाचा हिशेब ठेवण्यापेक्षा येणाऱ्या भविष्याबाबत विचार करायला हवा असा सल्ला दिला. यावेळी त्यांनी त्यांच्या वाढदिवसाचा एक किस्सा देखील सांगितला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मला एका नेत्याने माझ्या वाढ दिवसादिवशी फोन केला होता. १७ सप्टेंबर रोजी फोन करून मला नेता म्हणाला की, तुम्ही आता ७५ वर्षाचे झाले आहेत. त्यावर मी त्यांना पटकन अजून २५ वर्षे शिल्लक आहेत असे उत्तर दिले. मी पाठीमागची वर्षे मोजत नाही. जी राहिली आहेत ती मोजतो, असे मोदी म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे उदाहरण देत विद्यार्थ्यांना ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### देशात पुन्हा 'बर्ड फ्लू'ची एन्ट्री

चेन्नई: चेन्नईमध्ये गेल्या काही दिवसांत अत्यंत घातक 'एच५ एन१' विषाणूने अंदाजे १,००० ते १,५०० कावळ्यांचा मृत्यू झाला आहे. अड्यार, वेलाचेरी, तिरुवनमियूर आणि ईस्ट कोस्ट रोड या परिसरांमध्ये मोठ्या प्रमाणात बर्ड फ्लूचा संसर्ग पसरला आहे. तामिळनाडू सरकारने हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तातडीने पावले उचलत जनतेसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. केंद्र सरकारने देखील राज्याला प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक तीव्र करण्याचे आवाहन केले आहे. विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी, जैव–सुरक्षा नियमांनुसार मृत कावळे आणि कुक्कुटपालनातील पक्ष्यांचे अवशेष जाळून टाकण्याचे किंवा जमिनीत खोलवर गाडण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत. नागरिकांनी मृत पक्ष्यांना स्पर्श करू नये किंवा त्यांना हाताळू नये आणि कोठेही मृत पक्षी आढळल्यास तातडीने स्थानिक प्रशासनाला कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### छ. संभाजीनगरच्या महापौरपदी भाजप

छ. संभाजीनगर : महापालिका निवडणुकीपूर्वी आणि निवडणुकीनंतर भांडणाऱ्या आणि स्वबळावर ५७ नगरसेवक निवडून आल्यानंतर महापौर, उपमहापौरपदासह सर्वच पदांवर दावा सांगणाऱ्या भाजपने अखेर बहुमतासाठी शिवसेनेला सोबत घेतले आहे. भाजपचा महापौर कोण यासाठी डझनभर इच्छुकांपैकी २ नावे भाजपाच्या प्रदेश समितीकडे पाठवण्यात आली होती. यात समीर राजूरकर आणि अनिल मकरी यांच्या नावाचा समावेश होता. प्रदेश समितीने महापौरपदासाठी समीर राजूरकर यांचे नाव निश्चित केले आहे. तर उपमहापौर पदावर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांची निवड करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर महापालिकेत ३३ नगरसेवकांसह प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या एमआयएम पक्षाला रोखण्यासाठी भाजप–शिवसेनेने समीर राजूरकर, राजेंद्र जंजाळ यांच्या रूपाने आक्रमक आणि तरुण चेहरे दिले आहेत. समीर राजूरकर हे भाजपचे अभ्यासू नगरसेवक म्हणून ओळखले जातात. समर्थनगर प्रभागातून ते निवडून आले आहेत.

### आरबीआयचे व्याज दर कमीच राहणार

मुंबई: आरबीआय अर्थात रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी शुक्रवारी (६ फेब्रुवारी २०२६) सांगितले की, प्रमुख धोरणात्मक दर दीर्घकाळासाठी कमी पातळीवर राहतील आणि ते आणखी खाली येऊ शकतात. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अर्थात मध्यवर्ती बँकेने आपल्या द्वैमासिक पतधोरणात रेपो दर ५.२५% वर अपरिवर्तित ठेवण्याचा निर्णय घेतल्यानंतर आणि धोरणात्मक भूमिका तटस्थ ठेवल्यानंतर हे विधान आले आहे. संजय मल्होत्रा पुढे म्हणाले की, ''धोरणात्मक व्याज दर दीर्घकाळासाठी कमी पातळीवर राहतील (आणि) ते आणखी खाली येतील,'' अशी माहिती पतधोरण बैठकीनंतरच्या पत्रकार परिषदेत सांगितले. तथापि, दरांबाबतचा निर्णय पतधोरण समिती घेईल, असेही त्यांनी नमूद केले. गेल्या वर्षी फेब्रुवारीपासून, आरबीआयने रेपो दरात १२५ आधार अंकांनी कपात केली. गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले की, ठेवींच्या बाजूने धोरणात्मक प्रसार मंदावला आहे आणि मुदत ठेवींवरील व्याजदर कमी होतील.

# आता तीन किंवा अधिक मुलांचे पालकही निवडणूक लढवू शकणार !

## स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीसाठी राजस्थान सरकारचा ऐतिहासिक निर्णय

**जयपूर । वृत्तसंस्था**

राजस्थानमधील भजनलाल शर्मा सरकार राज्याच्या राजकारणात एक मोठा आणि दूरगामी बदल घडवून आणण्याच्या तयारीत आहे. राज्य सरकारने स्पष्टपणे सूचित केले आहे की, पंचायत आणि महानगरपालिका निवडणुकांसाठी दोन मुलांची अट रद्द




केली जाईल. विधानसभेत सादर केलेल्या सरकारच्या उत्तरानुसार, तीन किंवा त्याहून अधिक मुले असलेल्या व्यक्ती आता नगरपालिका आणि पंचायत निवडणुका लढवू शकतील.

जवळजवळ तीन दशकांपासून सुरू असलेला हा नियम रद्द करण्यासाठी सरकारने पावले उचलली आहेत. हा निर्णय ''मिशन २०२६'' चा एक भाग असल्याचे मानले जाते. ज्याचा उद्देश ग्रामीण ▶▶ पान २ वर

# विरोधकांची जोरदार घोषणाबाजी, अध्यक्षांचा निर्णय; लोकसभेचे कामकाज ९ फेब्रुवारीपर्यंत तहकूब

**दिल्ली । वृत्तसंस्था**

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६–२७ वरील सर्वसाधारण चर्चेला शुक्रवारी सुरुवात होताच लोकसभेत प्रचंड गोंधळ उडाला. विरोधी पक्षांच्या जोरदार घोषणाबाजीमुळे काही मिनिटांतच लोकसभेचे कामकाज सोमवार (दि.९) सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. सकाळी ११ वाजता लोकसभेचे कामकाज सुरू ▶▶ पान २ वर



# लाडक्या बहिणींना शेवटची संधी

## ३१ मार्चपर्यंत करता येणार 'ईकेवायसी'

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांसाठी राज्य सरकारने एक मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला असून, ज्या महिलांनी ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करताना तांत्रिक किंवा नजरचुकीने माहिती भरण्यात चूक केली होती, त्यांना आता आपल्या अर्जात सुधारणा करण्याची पुन्हा एक संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. योजनेंतर्गत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ▶▶ पान २ वर

# ऑनलाइन फ्रॉड झाल्यास आरबीआयकडून मिळणार २५ हजार रुपयांपर्यंत भरपाई

**मुंबई । प्रतिनिधी**

डिजिटल व्यवहारांच्या युगात ऑनलाइन फसवणुकीचे प्रमाण वाढत असताना भारतीय रिझर्व्ह बँकेने सर्वसामान्य ग्राहकांसाठी एक मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. ऑनलाइन फसवणुकीत पैसे गमावलेल्या ग्राहकांना आता आरबीआयकडून आर्थिक मदत मिळणार असून, यासाठी नवीन नियमावली तयार करण्यात येत आहे. या नव्या नियमानुसार, ग्राहकांना जास्तीत जास्त २५,००० रुपयांपर्यंतची भरपाई मिळू शकणार



आहे.

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी शुक्रवारी पतधोरण ▶▶ पान २ वर

# अजित पवारांच्या मृत्यूचे राजकारण बंद झाले पाहिजे

## देवेंद्र फडणवीसांनी सर्वांनाच खडसावले

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर सुरू असलेल्या राजकीय वादावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र संताप व्यक्त केलाय. या दुर्दैवी घटनेचे भांडवल करून खालच्या पातळीचे राजकारण करणे अत्यंत चुकीचे आणि दुर्दैवी असल्याचे त्यांनी सांगितले.

बारामतीकडे जाताना झालेल्या या भीषण अपघाताची सखोल चौकशी सुरू असून, अशा काळात संयम राखणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. दरम्यान, सुनेत्रा पवार यांचा ▶▶ पान २ वर

## बाजारभाव


**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.६ फेब्रुवारी २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २८.५० क्विंटल | २,२०१ | २,८५१ | २,५२३ |
| ज्वारी/हायब्रिड: २३.५० क्विंटल | २,०४१ | ४,०५१ | ३,२१९ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ८९.५० क्विंटल | ७,००० | ८,३०० | ७,८८७ |
| उडीद : २.०० क्विंटल | ४,८०१ | ६,१०० | ५,४५० |
| बाजरी: १६.५० क्विंटल | २,२०० | ३,२०० | २,७०५ |
| मुग: २.०० क्विंटल | ६,८०१ | ६,८०१ | ६,८०१ |
| सोयाबीन: ७०.५० क्विंटल | ५,३०० | ५,६५० | ५,५५० |
| हरभरा:१.५० क्विंटल | ५,१०१ | ५,३६१ | ५,२३१ |

# भक्तनिवास की भूत बंगला!

## शनिदेवाचे शक्तीपीठ राक्षस भुवन मधील भक्तनिवासाला अवकळा



**गेवराई–बीड । प्रतिनिधी**

गेल्या वीस वर्षांपूर्वी तात्कालीन लोकप्रतिनिधी अमरसिंह पंडित यांनी प्रयत्न करून तात्कालीन उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते पायाभरणी केलेल्या शनि देवाचे शक्तिपीठ असलेल्या राक्षस भवन येथील भक्ती निवासाची अवस्था सद्या अत्यंत दयनीय झाली असून, ते भक्तनिवास आहे की, भूत बांगला अशी स्थिती निर्माण झाली आहे. राज्यभरातून येणाऱ्या भाविक भक्तांना विधी केल्यानंतर मुक्कामासाठी तेथून थेट गेवराईला म्हणजेच २२ किलोमीटर हेलपाटे मारावे लागत आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधीकडून याकडे मात्र दुर्लक्ष झाले असून, ते सद्या गेवराई पेक्षा बीड शहरामध्ये अधिक लक्ष घालत असल्याचा हा परिणाम असल्याचे बोलले जात आहे.

गेवराई तालुक्याचे बहुतांशी राजकारण हे राक्षस भवन रस्ता आणि तेथील व्यवस्था यावरच चालले गेले. अनेक वर्ष राक्षस भवन ते गेवराई रोड ▶▶ पान २ वर

## लोकप्रतिनिधींचे गेवराईपेक्षा बीडकडे अधिक लक्ष असल्याचा परिणाम

### आ. विजयसिंह पंडितांचे दुर्लक्ष

गेवराई मतदार संघातील मतदारांनी मोठ्या विश्वासाने विजयसिंह पंडित यांना विजयी केले. त्यानंतर नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये गेवराई नगरपालिकेत यश मिळाले नाही मात्र बीडमध्ये त्यांच्यावर जबाबदारी दिल्यानंतर तेथे यश मिळाले. त्यामुळे त्यांनी मतदारसंघ ऐवजी बीडवर लक्ष केंद्रित केल्याने ही दुरावस्था होत असल्याचे बोलले जात आहे.


### भाविक भक्तामध्ये प्रचंड नाराजी

शनि महाराजांचे शक्तिपीठ असलेल्या राक्षस भवन येथे दर्शनासाठी राज्यभरातून भावीक येत असतात. प्रत्येक अमावस्याला यात्राच असते. अशा काळात निवासासह इतर सुविधा मिळाव्यात, मात्र त्या मिळत नसल्याच्या भावना भाविक भक्त व्यक्त करीत आहेत. या संदर्भातील तक्रार नेमकी कोणाकडे करायची असाही प्रश्न त्यांच्यासमोर आहे.

छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ ( Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352



महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
● डोकेदुखी / अती चिंता व काळजी
➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता–पायात मुंग्या येणे)
● झोपेच्या समस्या
➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
● व्यसनाधिनता : (दारु, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
● बालकांच्या समस्या :
➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
● स्मृती भंग (विसरभोळेपणा)
● लैंगिक समस्या
➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
● स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या



नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
कु.डॉ.जयश्री श्रीराम टेकाळे (M.B.B.S.) वैद्यकिय अधिकारी, मो.7743990988
श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) सामाजिक कार्यकर्ते,पाटोदेकर मो.9075387638

cmyk

## अग्रलेख

# ममता बॅनर्जी यांचा टोकाचा विरोध

भारताच्या न्यायालयीन इतिहासात बुधवारी प्रथमच एक सनसनाटी घटना घडली आहे. एका राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर असलेल्या व्यक्तीने सर्वोच्च न्यायालयात स्वत: युक्तीवाद केला आहे. हे प्रकरण आहे पश्चिम बंगालमधील मतदारसूची पुनर्सर्वेक्षण अभियानाचे किंवा एसआयआरचे आणि या व्यक्ती आहेत, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी. बॅनर्जी या अशा प्रकारचे स्टंट करण्यासाठी प्रसिद्ध आहेत. पण आजवर ते त्या निवडणूक प्रचाराच्या सभांमध्ये किंवा राजकीय आखाड्यांमध्ये करीत होत्या. आता त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचाही समावेश या स्थानांमध्ये केलेला दिसून येतो. पश्चिम बंगालमध्ये सध्या केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदारसूची पुनर्सर्वेक्षण अभियान जोमाने हाती घेतले आहे. या राज्यातल्या मतदारसूचीतील अनेक घोटाळे यामुळे बाहेर पडत आहेत. अनेक विचित्र प्रकार समोर येत आहेत. या अभियानाचा प्रथम टप्पा पार पडला असून अस्थायी मतदारसूची काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध करण्यात आली. आयोगाने राज्यातील साधारणत: ५८ लाख मतदारांची नावे विविध कारणांस्तव वगळली आहेत. वगळलेल्या नावांमध्ये मृत, बेपत्ता आणि स्थलांतरित अशा मतदारांचा समावेश आहे. तसेच आणखी जवळपास १ कोटी मतदारांना संशयास्पद ठरविण्यात आलेले आहे. कारण त्यांची जी माहिती आयोगाकडे पोहचलेली आहे, गंभीर आहे. बाप आणि मुलगा यांच्या वयात केवळ १० ते १२ वर्षांचे अंतर असणे, नातू आणि आजोबा यांच्या वयात केवळ २५ ते ३० वर्षांचे अंतर असणे, एकाच बापाची २०० किंवा ३०० मुले असणे असे विविध आश्चर्यकारक आणि अनैसर्गिक प्रकार दिसून आले असल्याने निवडणूक आयोगाचेच काय, तर सर्वसामान्य माणसाचे कानही टवकारले जाणे स्वाभाविक आहे.

मतदारसूचीत चुका घडतात हे जरी खरे असले, तरी असे प्रकार जेव्हा लाखो किंवा कोटींच्या प्रमाणात घडतात, तेव्हा त्या केवळ 'क्लेरिकल मिस्टेक्स' मानून त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरते. अशा सर्व संशयास्पद मतदारांना आयोगाने नोटीसा पाठविल्या असून त्यांना कागदपत्रांसह त्यांचे मतदारत्व सिद्ध करण्यास सांगण्यात आले आहे. त्यांच्या दाव्यांची छाननी करण्यासाठी मोठी यंत्रणा उभी करण्यात आली आहे. केंद्र सरकारनेही या कामासाठी अन्य राज्यांमधील अधिकाऱ्यांचे साहाय्य घेण्याची सज्ञता केली आहे. खरेतर यांपैकी कोणत्याही बाबींचा राजकीय नेत्यांशी संबंध नसतो. मतदारसूची पुनर्सर्वेक्षण अभियान वेळोवेळी हाती घेणे आणि मतदारसूची 'स्वच्छ' करणे हा केंद्रीय निवडणूक आयोगाचा अधिकारच आहे. इतकेच नव्हे, तर तो केवळ केंद्रीय निवडणूक आयोगाचा अधिकार असून तो अन्य कोणत्याही संस्थेचा नसतो. सर्वोच्च न्यायालयानेही ही बाब स्पष्ट केली आहे. असे असूनही ममता बॅनर्जी यांनी ही बाब इतक्या गंभीरपणे घेतल्यामुळे कुठेतरी पाणी मुरते आहे, असा संशय घेण्यास जागा आहे. गेल्या अनेक वर्षांमध्ये मतदारसूची स्वच्छ करण्यात आलेली नाही. कोणत्याही वैध मतदाराचे नाव मतदारसूचीतून वगळले जाता कामा नये, तर कोणत्याही अवैध मतदाराचे नाव मतदासूचीत समाविष्ट होता कामा नये, हे महत्त्वाचे तत्व आहे. याच तत्वावर लोकशाही जिवंत राहते. तथापि, अनेकदा अवैध आणि घुसखोर व्यक्तींची नावे अनेक गैरप्रकार करुन आणि खोटी कागदपत्रे बनवून मतदारसूचीत घुसविली जातात. अनेकदा अस्तित्वात नसलेल्या मतदारांच्या नावे खोट्या कागदपत्रांच्या आधारे मतदार ओळखपत्रे बनविली जातात. नंतर हे अवैध मतदार भारताच्या लोकशाहीचे भवितव्य ठरवितात. हा प्रकार देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि एकात्मतेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदारसूचीतील या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न चालविला असेल, तर त्याला सर्व राजकीय पक्षांनी सहकार्य करणे आवश्यक असते. जो १८ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाचा व्यक्ती या देशाचा वैध नागरीक नाही, त्याला या देशात मतदान करण्याचा अधिकार नाही. तो वैध नागरीक आहे की नाही, याची पडताळणी करण्याचा अधिकार केंद्रीय निवडणूक आयोगाचा असतो. कारण, या आयोगालाच मतदारसूची सज्ञ करावी लागते. तेव्हा प्रत्येक वैध नागरिकाचेही हे कर्तव्य आहे, की त्याने आयोगाला याकामी सहकार्य केले पाहिजे. मात्र, ममता बॅनर्जी, आयोगाला सहकार्य करण्याचे सोडाच, पण आयोगाच्या या पवित्र कार्यात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे दिसून येते. बॅनर्जी यांना अशी कोणती अडचण निर्माण झाली आहे, की जेणेकरुन त्यांनी स्वत: सर्वोच्च न्यायालयात उभे राहून आयोगाच्या अधिकाराधीन असणाऱ्या कर्तव्याला विरोध करावा? सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी ममता बॅनर्जी यांचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच काही महत्त्वाची टिप्पणीही केली. या सर्व प्रकरणाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्याच हाती आहे. तो यथावकाश समोर येईलच. तथापि, ममता बॅनर्जी यांचा या अभियानाला इतका टोकाचा विरोध का, हा प्रश्न मागे उरतोच. आयोगाने केवळ पश्चिम बंगालमध्येच हे अभियान चालविलेले नाही. ते तामिळनाडू आणि अन्य राज्यांमध्येही सुरु आहे. तामिळनाडूतही जवळपास १ कोटी नावे वगळण्यात आली आहेत. उत्तर प्रदेशात तर त्याही पेक्षा अधिक म्हणजे जवळपास ३ कोटी नावे संशयास्पद आहेत. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने त्यावर अधिक चर्चा करता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर अनेक बाबी स्पष्ट होतील. बऱ्याच प्रश्नांची उत्तरे या निर्णयातून मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे आणखी काही दिवसांमध्ये सर्वकाही सूर्यप्रकाशाइतक्या स्वच्छपणे समोर येणार आहे.

# तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिला निराधाराला आधार

अंबड । प्रतिनिधी

**विजय चव्हाण तहसीलदारांची संवेदनशीलता सोशल मीडियावरील व्हिडिओमुळे लागला शोध; ७५ वर्षीय निराधाराला कार्यालयात बोलावून तात्काळ दिला 'श्रावणबाळ' योजनेचा आधार सोशल माध्यमावर पाच-सहा महिन्यांपूर्वी एका वृद्ध व्यक्तीचा व्हायरल झालेला व्हिडिओ पाहून, प्रशासनाने मनावर घेतल्यास काय होऊ शकते याचा प्रत्यय अंबडमध्ये आला आहे. मागील अनेक महिन्यांपासून शोध सुरू असलेल्या मौजे जामखेड येथील ७५ वर्षीय निराधार एकनाथ दिवटे यांना तहसीलदार विजय चव्हाण यांच्या तत्परतेमुळे 'श्रावणबाळ योजने'चा लाभ मंजूर करण्यात आला आहे.**



पाच-सहा महिन्यांपूर्वी सोशल मीडियावर एक वृद्ध व्यक्ती हलाखीच्या परिस्थितीत जगत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. तहसीलदार विजय चव्हाण यांनी तो व्हिडिओ पाहिला होता, परंतु सदर व्यक्ती कोणत्या गावची आहे हे समजू शकले नव्हते. तरीही मागील ४-५ महिन्यांपासून या व्यक्तीचा शोध प्रशासकीय पातळीवर सुरू होता. दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत पारदे यांच्या अध्यक्षतेखाली अंबड व घनसावंगी तालुक्यातील पोलीस पाटील यांची आढावा व प्रशिक्षण बैठक आयोजित करण्यात आली होती. या प्रशिक्षणादरम्यान तहसीलदार चव्हाण यांनी त्या वृद्ध व्यक्तीचे वर्णन करून पोलीस पाटलांकडे विचारणा केली. त्यावेळी जामखेड येथील पोलीस पाटील यांनी सदर व्यक्ती आपल्या गावातील असल्याचे व त्यांचे नाव श्री. एकनाथ दिवटे असल्याचे सांगितले. श्री. एकनाथ दिवटे (वय ७५) हे पूर्णतः निराधार असून, त्यांच्या मुलाचे चार वर्षांपूर्वी निधन झाले आहे. पत्नी नाही, स्वतःचे घर नाही आणि ते एकटेच राहतात. गावातील दुकानांसमोरील अंगण झाडून दुकानदार जे काही देतील, त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालतो, अशी माहिती समोर आली. या माहितीची दखल घेत तहसीलदार चव्हाण यांनी संबंधित पोलीस पाटील यांना सदर आजोबांना तात्काळ सन्मानाने तहसील कार्यालयात घेऊन येण्याचे निर्देश दिले. काल, दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री. दिवटे यांना कार्यालयात आणले असता, ते अतिशय थकलेले आणि संजय गांधी निराधार योजनेच्या लाभापासून अनेक वर्षांपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले. क्षणाचाही विलंब न लावता, त्यांचा अर्ज भरून घेत, 'श्रावणबाळ योजने'ची संचिका तात्काळ मंजूर करण्यात आली. पुढील महिन्यापासून त्यांना या योजनेचे अनुदान मिळणे सुरू होईल. एका खऱ्या गरजूला मदत करू शकलो, याचे अत्यंत समाधान वाटत असल्याची भावना तहसीलदार विजय चव्हाण यांनी व्यक्त केली. याच अनुषंगाने अंबड तालुक्यात आता 'संजय गांधी निराधार योजने'ची शुद्धता मोहीम हाती घेण्यात आली आहे. अपात्र लाभार्थी: जे लाभार्थी कमी वयाचे आहेत, ज्यांचे उत्पन्न जास्त आहे किंवा जे नियमात बसत नसतानाही लाभ घेत आहेत, त्यांची तपासणी करून खात्रीअंती त्यांची नावे कमी करण्यात येणार आहेत. खरे लाभार्थी: तालुक्यातील गरजू व्यक्ती, निराधार, घटस्फोटित महिला, एकल महिला, परित्यक्त्या महिला यांचा शोध घेऊन त्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तालुक्यातील सर्व नागरिक व पत्रकार आणि समाजसेवकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या गावात कोणी असे पात्र निराधार व्यक्ती (जसे की श्री. दिवटे) असल्यास, त्यांची माहिती गावातील पोलीस पाटील, कोतवाल, महसूल सेवक किंवा तलाठी यांच्यामार्फत तात्काळ तहसील कार्यालयात कळवावी, जेणेकरून त्यांचा प्रस्ताव दाखल करून लाभ सुरू करता येईल. तसेच, जे अपात्र व्यक्ती चुकीच्या पद्धतीने लाभ घेत आहेत, त्यांची नावे व पुराव्यासह माहिती तहसील कार्यालयास द्यावी. माहिती देणाऱ्यांची नावे पूर्णतः गोपनीय ठेवली जातील. अशा अपात्र व्यक्तींची नावे कमी करून खऱ्या गरजूना न्याय देणे हे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे. जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल मॅडम, उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत पारदे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड तालुका प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. तरी पुढील महिनाभर चालणाऱ्या या खऱ्या लाभार्थी शोध मोहिमेस सर्वांनी सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन तहसीलदार विजय चव्हाण यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे संस्कार समाजात रुजवावेत-प्राचार्य डी.डी.राऊत

## तुलसी कनिष्ठ महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांचा 'निरोप समारंभ' उत्साहात

बीड । प्रतिनिधी

**निरोप समारंभाकडे केवळ एक निरोप म्हणून न पाहता, त्याकडे 'रोप समारंभ' म्हणून पाहावे. इथून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी महाविद्यालयाच्या संस्कारांचे एक रोप आहे, जे समाजाच्या विविध क्षेत्रांत जाऊन या संस्कारांचे रोपण करेल, असे प्रेरणादायी प्रतिपादन तुलसी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डी.डी.राऊत यांनी केले.**



देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कनिष्ठ महाविद्यालय, बीड येथे बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी गुरुवार (दि.५) रोजी आयोजित निरोप समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश ढोकणे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून गुरुकुल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल, प्रा.संजय खाडे, डॉ.विकास वाघमारे आणि आयु.माधुरी घुंबरे यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. राऊत पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये साधारणपणे तीन प्रकार आढळतात. काही विद्यार्थी अत्यंत हुशार असतात, काही मध्यम स्तरातील असतात, तर काही विद्यार्थी अभ्यासात मागे राहणारे असतात. मात्र, यश केवळ बुद्धिमत्तेवर अवलंबून नसून मेहनत, सातत्य आणि योग्य दिशेने केलेले प्रयत्न यावर अवलंबून असते. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही गुण दडलेले असतात. त्या गुणांची ओळख करून त्यावर सातत्याने मेहनत घेतल्यास प्रत्येक विद्यार्थी आयुष्यात यशस्वी होऊ शकतो, असा आत्मविश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना ध्येय निश्चित करून त्यासाठी जिद्दीने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. मेहनत, शिस्त आणि ज्ञान यांच्या जोरावरच यशाचा मार्ग सुकर होतो, असे त्यांनी सांगितले. प्राचार्य प्रकाश ढोकणे यांनी बारावीचे वर्ष विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारे असल्याचे सांगत गुणवंत होण्यासाठी सर्वांगीण विकास आवश्यक असल्यावर भर दिला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा दिला. काहींनी मनोगतातून कृतज्ञता व्यक्त केली, तर काहींनी कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे समारंभाची रंगत अधिकच वाढली. अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात हा निरोप सोहळा पार पडला.

## पान १ वरून...

### तेलबिया उत्पादनात

आधारभूत किंमत प्रभावीपणे राबवणे, तसेच आवश्यकतेनुसार आयात शुल्कामध्ये बदल करून देशांतर्गत उत्पादकांचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला आहे.देशातील खाद्यतेलाची वाढती मागणी आणि मोठ्या प्रमाणावर असलेले आयातीवरील अवलंबित्व लक्षात घेता, तेलबिया उत्पादन वाढवणे ही काळाची गरज बनली होती. याआधी भारताला मोठ्या प्रमाणावर खाद्यतेल आयात करावे लागत होते, ज्याचा थेट परिणाम परकीय चलन साठ्यावर आणि देशांतर्गत बाजारातील दरांवर होत होता. मात्र सध्याच्या धोरणांमुळे आयातीवरील अवलंबित्व कमी होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.तसेच प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियान अंतर्गत तेलबियांची शासकीय खरेदी केली जात असून, त्यामुळे शेतकऱ्यांना हमीभाव मिळत आहे. बाजारभाव घसरले तरी शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी ही योजना महत्त्वाची ठरत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर राहण्यास आणि उत्पादनात सातत्य राखण्यास मदत होत आहे. एकूणच राष्ट्रीय खाद्यतेल-तेलबिया अभियानामुळे तेलबिया उत्पादन, शेतकऱ्यांचे उत्पन्न, बाजारातील स्थैर्य आणि देशाची खाद्यतेल आत्मनिर्भरता या सर्व आघाड्यांवर सकारात्मक परिणाम दिसून येत असून, आगामी काळात भारत खाद्यतेलाच्या बाबतीत अधिक सक्षम आणि आत्मनिर्भर बनेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

-------------

### अजून २५ वर्षे शिल्लक

प्रेरित करत, तुम्ही देखील मागचे मोजण्यात वेळ वाया घालवू नका पुढे काय आहे याचा विचार करा असा सल्ला दिला. पंतप्रधान मोदी यांनी परीक्षा म्हणजे आयुष्य नाही. परीक्षा हे आयुष्य सुधारण्याचे एक साधन आहें, मात्र हे अंतिम नाही. अंतिम लक्ष्य संपूर्ण आयुष्य चांगले करणें हे आहे. १० वर्षाचे पेपर वाचून जाण्यासारख्या विचारांपुरतेच मर्यादित ठेवू नका, आयुष्यात सर्वोत्तम बनण्याचा प्रयत्न करा असा सल्ला देखील मोदींनी दिला.

----------

### महापौर निवडणुकांत

झाले आहेत. त्यांनी बिनविरोधची परंपरा कायम ठेवली आहे. धुळे महानगरपालिकेवर भाजपाचा झेंडा. महापौर पदी मायादेवी परदेशी तर उपमहापौर पदी ज्योत्स्ना पाटील या विजयी. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्याकडून पुष्पगुच्छ देऊन महापौर उपमहापौर यांना शुभेच्छा.महापालिका निवडणुकीपूर्वी आणि निवडणुकीनंतर भांडणाऱ्या आणि स्वबळावर ५७ नगरसेवक निवडून आल्यानंतर महापौर, उपमहापौरपदासह सर्वच पदांवर दावा सांगणाऱ्या भाजपने अखेर बहुमतासाठी शिवसेनेला सोबत घेतले आहे. डझनभर इच्छुकांपैकी २ नावे भाजपाच्या प्रदेश समितीकडे पाठवण्यात आली होती. यात समीर राजूरकर आणि अनिल मकरी यांच्या नावाचा समावेश होता. आज प्रदेश समितीने महापौरपदासाठी समीर राजूरकर यांचे नाव निश्चित केले आहे. तर उपमहापौर पदावर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांची निवड करण्यात आली आहे. नागपूरमध्ये महापौर, उपमहापौरपदासाठी पार पडलेल्या निवडणुकीत भाजपच्या नीता ठाकरे व लीला हाथीबेड यांनी काँग्रेसच्या अनुक्रमे स्नेहल ठाकरे व विवेक निकोसे यांचा पराभव केला. भाजपच्या महापौर पदाच्या उमेदवार नीता ठाकरे यांना १०४ मत पडली. काँग्रेसच्या महापौर पदाच्या उमेदवार स्नेहल ठाकरे यांना ३६ मत पडली. अपेक्षेप्रमाणे नीता ठाकरे नागपूरच्या ५५ व्या व आठव्या महिला महापौर ठरल्या. सोलापूर महापालिकेच्या महापौरपदी भाजपचे विनायक कोंड्याल बिनविरोध.त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहत कामकाजाला सुरुवात केली . या वेळी शिवसेना शिंदे गटाचे प्रियदर्शन साठे आणि एमआयएमच्या तौफिक हत्तूरे यांनी निवडणुकीच्या रिंगणातून ऐनवेळी माघार घेतली. कोल्हापूर महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपच्या रूपाराणी संग्रामसिंह निकम यांची तर उपमहापौरपदी जनसुराज्य शक्ती पक्षाचे अक्षय विक्रम जरग यांची बहुमताने निवड करण्यात आली. या निवडीमुळे कोल्हापूरच्या इतिहासात प्रथमच महायुतीची सत्ता स्थापन झाली आहे. महापौरपदाच्या निवडणुकीत रूपाराणी निकम यांना ४६ मते मिळाली, तर काँग्रेसचे उमेदवार सचिन मारुती शेंडे यांना ३५ मते मिळाली. चंद्रपूर महानगरपालिका महापौरपदासाठी निवडणूक ही १० फेब्रुवारीला विशेष सभेत होणार असून, महापौर पदासाठी १० तर उपमहापौर पदासाठी ६ अर्ज आले आहेत. तर मुंबईत ७ फेब्रुवारी रोजी महापौरपदासाठी इच्छुकांना आपले उमेदवारी अर्ज सादर करता येणार आहेत. त्यानंतर, बुधवार ११ फेब्रुवारी रोजी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले असून, याच दिवशी मुंबईच्या नव्या महापौरांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात येईल.

-------------

### विरोधकांची जोरदार घोषणाबाजी, अध्यक्षांचा

होताच विरोधी पक्षांच्या खासदारांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू केली. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी शांतता राखण्याचे आवाहन केले. मात्र, विरोधकांनी गोंधळ सुरूच ठेवल्याने अवघ्या पाच मिनिटांतच लोकसभेचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब केले. दुपारी पुन्हा सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यानंतरही विरोधकांकडून जोरदार घोषणाबाजी सुरु होती. विरोधी पक्षाच्या खासदारांनी सभागृहात फलक दाखवत सरकारवर टीका केली. यावेळी लोकसभेच्या अध्यक्षस्थानी कृष्णकुमार टेनेटी होते. त्यांनी विरोधी पक्षाने दिलेले तहकूब प्रस्ताव अध्यक्षांनी फेटाळल्याचे सांगत कामकाज पुढे नेण्याचा प्रयत्न केला. केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांच्यासह काही मंत्र्यांनी आपल्या नावावरील कागदपत्रे सभागृहात सादर करण्यास सुरुवात केली. परंतु त्याचवेळी विरोधी पक्षातील खासदारांनी अध्यक्षांच्या आसनाजवळ येत जोरदार घोषणाबाजी सुरु केली. त्यामुळे अध्यक्षांनी लोकसभेचे कामकाज सोमवार सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब केले. संसद भवनाच्या मकर द्वाराजवळही विरोधकांनी शुक्रवारी आंदोलन केले. भारत-अमेरिका व्यापार कराराच्या निषेधार्थ विरोधी खासदारांनी हा करार सापळा असल्याचा आरोप करत फलक दाखवले. यावेळी जो उच्चीत समझो वही करो, तानाशाही नही चलेगी अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. या आंदोलनात काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनीही सहभाग घेतला. यापूर्वीही संसदेत गदारोळ झाला होता. २०२० मधील चीन सीमावादावर माजी लष्करप्रमुख जनरल एम. एम. नरवणे यांच्या अप्रकाशित आत्मचरित्रातील उतारा उद्धृत करण्यास राहुल गांधींना परवानगी नाकारण्यात आल्यानंतर विरोधकांनी संसदेत आंदोलन केले होते. राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली.

--------------

### आता तीन किंवा अधिक मुलांचे

आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात व्यापक सामाजिक सहभाग सुनिश्चित करणे आहे. विधानसभेत सरकारने दिलेल्या उत्तरानुसार सध्याच्या सामाजिक आणि लोकसंख्याशास्त्रीय परिस्थितीत हा नियम अप्रासंगिक बनला आहे. लोकशाहीमध्ये निवडणूक लढवण्याचा अधिकार कुटुंबाच्या आकाराशी जोडला जाऊ नये असे सरकारचे मत आहे. या निर्णयामुळे विशेषतः ग्रामीण भाग, मागासवर्गीय आणि उपेक्षित समुदायांना महत्त्वपूर्ण राजकीय फायदे मिळू शकतात. या अटीमुळे अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधींना यापूर्वी निवडणूक प्रक्रियेतून वगळण्यात आले आहे. सरकार लवकरच या संदर्भात कायदेशीर प्रक्रिया आणि सुधारणा अंतिम करेल अशी अपेक्षा आहे. विरोधी पक्षही या निर्णयाविरुद्ध आवाज उठवत आहेत. पीसीसी प्रमुख गोविंद सिंह दोतासरा यांनी याला लोकसंख्या नियंत्रण धोरणापासून दूर जाणे असे म्हटले. दोतासरा म्हणाले की, भैरोंसिंग शेखावत यांनी दोनपेक्षा जास्त मुले असलेल्यांना निवडणूक लढवण्यास बंदी घातली होती. परंतु आता तीनपेक्षा जास्त मुले असण्याबाबत संघ प्रमुख मोहन भागवत यांच्या विधानानंतर सरकार त्यांचे अनुकरण करत आहे. हा निर्णय घेत आहे. सरकार याला लोकशाही सुधारणा म्हणून सादर करत आहे. भाजप आमदार गोपाल शर्मा यांनी या निर्णयाबद्दल सांगितले की, ''राजस्थानचे माजी मुख्यमंत्री भैरोंसिंग शेखावत यांनी दोनपेक्षा जास्त मुले असलेल्या लोकांना निवडणूक लढवण्यास बंदी घातली होती. त्यावेळी देश लोकसंख्या नियंत्रणाकडे वाटचाल करत होता. त्यावेळी परिस्थिती वेगळी होती आणि आताही वेगळी आहे. सध्याची परिस्थिती पाहता, सरकारचा निर्णय पूर्णपणे योग्य आहे असे मला वाटते. सर्व जाती आणि धर्माच्या लोकांना याचा फायदा होईल. सरकारने हा निर्णय काळजीपूर्वक विचार करून घेतला आहे.'' राजस्थानने पंचायत आणि नगरपालिका निवडणुका लढवणाऱ्या उमेदवारांसाठी दोन मुलांची मर्यादा बऱ्याच काळापासून लागू केली आहे. लोकसंख्या नियंत्रणाला प्रोत्साहन देण्यासाठी हे करण्यात आले होते, परंतु कालांतराने या नियमाबाबत भेदभाव आणि सामाजिक असमतोलाचे आरोप होऊ लागले आहेत.

--------

### अजित पवारांच्या मृत्यूचे

शपथविधी ही प्रशासकीय गरज असून त्यावरून तर्कवितर्क लढवू नयेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. याचवेळी फडणवीस यांनी विदर्भातील औद्योगिक विकासावर भाष्य करत नागपूरमधील महिंद्रा समूहाच्या १५ हजार कोटींच्या गुंतवणुकीचे स्वागत केले, ज्यामुळे राज्याच्या प्रगतीला नवी चालना मिळणार आहे.

-------------

### ऑनलाइन फ्रॉड झाल्यास आरबीआयकडून

बैठकीनंतर यासंदर्भातील माहिती दिली. डिजिटल पेमेंट अधिक सुरक्षित करणे आणि ग्राहकांचा विश्वास वाढवणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. लवकरच या नियमावलीचा मसुदा जाहीर केला जाणार आहे. नव्या नियमानुसार, भरपाईची रक्कम दोन निकषांवर ठरवली जाईल. फसवणूक झालेल्या रकमेच्या ८५ टक्के किंवा २५,००० रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल, तितकीच मदत ग्राहकाला मिळेल. ५० हजारांचा फ्रॉड झाल्यास ५० हजार रुपयांच्या ८५% रक्कम ४२,५०० रुपये होते. मात्र, कमाल मर्यादा २५ हजार असल्याने ग्राहकाला फक्त २५,००० रुपयेच मिळतील. १ लाखाचा फ्रॉड झाल्यास १ लाख रुपयांच्या ८५% रक्कम ८५ हजार रुपये होते. येथेही कमाल मर्यादेमुळे फक्त २५,००० रुपयेच दिले जातील. २० हजारांचा फ्रॉड झाल्यास २० हजार रुपयांच्या ८५% रक्कम १७,००० रुपये होते. ही रक्कम २५ हजारांच्या मर्यादेत असल्याने ग्राहकाला पूर्ण १७,००० रुपये मिळतील. ही मदत ग्राहकाला केवळ एकदाच मिळेल. वारंवार होणाऱ्या चुका टाळण्यासाठी आणि ग्राहकांनी सतर्क राहावे यासाठी ही अट घालण्यात आली आहे. इलेक्ट्रॉनिक बँकिंग फ्रॉडमध्ये ग्राहकाची नेमकी चूक किती होती, याचीही तपासणी केली जाणार आहे. २०१७ च्या जुन्या नियमांचीही आता समीक्षा केली जात आहे.

---------

### लाडक्या बहिणिंना

अनेक महिलांनी ई केवायसी पूर्ण केले. मात्र, कुटुंबातील सदस्यांच्या सरकारी नोकरी किंवा निवृत्तीवेतनाबाबतचा पर्याय निवडताना अनेक लाभार्थ्यांकडून चुकीची माहिती भरली गेली. यामुळे पात्र असूनही अनेक महिलांचे अर्ज अपात्रतेच्या धोक्यात आले होते. जिल्हाधिकारी स्तरावर याची प्रत्यक्ष पडताळणी सुरू असली, तरी प्रक्रियेला वेग देण्यासाठी आता ऑनलाईन दुरुस्तीची सुविधा देण्यात आली आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत अंतिम मुदत ज्या महिलांच्या अर्जात कुटुंबातील सदस्य सरकारी कर्मचारी असणे किंवा निवृत्तीवेतन घेणे या पर्यायाबाबत चूक झाली आहे, अशा महिलांना आता ३१ मार्च २०२६ पर्यंत ऑनलाईन पोर्टलवर जाऊन दुरुस्ती करता येईल.

**शासनाचे स्पष्ट निर्देश**

ही सुधारणा करण्याची अंतिम संधी असून यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. पोर्टलवर यासाठी आवश्यक तांत्रिक बदल करण्यात आले आहेत. लाभ सुरू ठेवण्यासाठी पात्र महिलांनी वेळेत ई-केवायसीमधील ही सुधारणा करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

-------------

### भक्तनिवास की भूत

हा १२ किलोमीटरचा रस्ता गेली अनेक वर्ष तयार नव्हता. तात्कालीन आमदार लक्ष्मण पवार यांनी जातीने लक्ष देऊन हा रस्ता पूर्ण करून घेतला. गेवराई तालुक्यातील राक्षस भवन हे साडेतीन पिठा पैकी एक शक्तिपीठ आहे, त्यामुळे या ठिकाणी राज्यच नव्हे तर देशभरातून भक्त दर्शनासाठी येतात. यासोबतच काही विधी देखील केल्या जातात, त्यासाठी देखील नियमित गर्दी असते. परंतु ज्या प्रमाणात भक्तांची गर्दी असते त्या प्रमाणात सुविधा मात्र नाहीत. गोदावरी नदी लगत असलेल्या या शनी मंदिराला पुरेसे संरक्षण देखील नसल्याचे दिसते. गोदावरी नदीच्या दोन्ही बाजूने घाटही तयार केलेले नाहीत. मुक्कामी येणाऱ्या भाविक भक्तांना तर तेथीलच ग्रामस्थांच्या झोपडीचा आधार घ्यावा लागतो. विशेष म्हणजे मागील वीस वर्षांपूर्वी तत्कालीन आमदार अमरसिंह पंडित यांनी तात्कालीन उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते कोट्यावधी रुपयाच्या भक्ती निवासाचे भूमिपूजन केले आणि त्यानंतर भक्ती निवास देखील उभे राहिले. भक्ती निवासाची इमारत सुंदर आणि देखणी झाली मात्र त्याची निगा राखली गेली नाही. आज स्थितीला या भक्ती निवासाला भूत बंगल्याचे स्वरूप आले आहे. आजूबाजूला काटेरी झुडपे, मोठमोठी झाडे आणि आतमध्ये तर उंदीर आणि घुशीचे साम्राज्य जाणवत आहे. प्रत्येक अमावष्यनिमित्त मोठा उत्सव राक्षस भवन येथे होतो. पूर्वी रस्ता देखील नव्हता, परंतु लक्ष्मण पवार यांनी हा रस्ता विशेष बाब म्हणून मंजूर करून घेतला आणि तो चांगलाही केला. आता रस्ता चांगला झाला आहे मात्र भक्ती निवासाची दुरावस्था अनेक भाविकांना दिसत आहे. वीस वर्षांपूर्वी बांधलेल्या या भक्ती निवासाची देखभाल करण्यासाठी कोणीच नसेल तर कोट्यावधी रुपयांच्या इमारतीचा काय उपयोग. ? भक्तांना उघड्यावर रात्र काढावी लागत असेल तर भक्ती निवास फक्त शोभेची वस्तू आहे का, असा सवालही उपस्थित केला जात आहे. गेवराईचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार विजयसिंह पंडित यांचा नगरपालिका निवडणुकीमध्ये झालेला पराभव आणि बीडमध्ये त्यांनी सूत्र हाती घेतल्यानंतर मिळालेल्या विजय यामुळे त्यांनी कदाचित आपल्याच मतदारसंघाकडे पाठ फिरवली असल्याची भावना देखील या निमित्ताने व्यक्त केली जात आहे.

---------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६


## थोडक्यात




## कराटे मार्शल आर्ट असोसिएशनला घवघवीत यश

माजलगाव । प्रतिनिधी

तिरंगा कप ओपन कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा संभाजीनगर येथे पार पडली या चंपियनशिप मध्ये कराटे मार्शल आर्ट असोसिएशन ने तिसरा पदक प्राप्त केले.आयांश देशपांडे सिल्वर मेडल,भार्गव पाठक सिल्वर मेडल,यशना वावळकर गोल्ड मेडल व सिल्वर मेडल श्रुती सिरसेवार गोल्ड मेडल,जानवी उगले सिल्वर मेडल,

अस्मिता मोगरे गोल्ड मेडल, अलीजा शेख सिल्वर मेडल, दिव्यांका हिरवे गोल्ड मेडल,सदिच्छा गायकवाड गोल्ड मेडल,हर्षद बागुल ब्रास मेडल,वैजनाथ सानप सिल्वर मेडल,सौरभ कांबळे सिल्वर मेडल,सोहम जाधव गोल्ड मेडल व सिल्वर मेडल, अवनी कुलकर्णी गोल्ड मेडल,ब्रास मेडल,सार्थक डोंगरे गोल्ड मेडल,अभिजीत राठोड गोल्ड मेडल या सर्वांनी फाईट व काता यामध्ये माजलगाव शहराचा नाव रोशन केलं माजलगावचे आमदार प्रकाश सोळंक व जयसिंग सोळंके यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

## लाड समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष एकनाथ लाड अनंतात विलीन

गेवराई । प्रतिनिधी

अखिल भारतीय लाड समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा नगरपरिषद कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष, नगरपरिषद कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन अशा विविध पदावर कार्यरत असलेले गेवराई नगर परिषद पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख एकनाथ आप्पा लाड यांच्यावर दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



गेवराई नगर परिषदेमध्ये गेल्या २७ वर्षापासून कार्यरत असलेले पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख एकनाथ लाड यांचे अल्पशा आजाराने दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे येथे उपचार सुरू असताना दुःखद निधन झाले. दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी दहा वाजता गेवराई येथील चिंतेश्वर मंदिर परिसरातील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अत्यंत शांत, मनमिळावू आणि प्रत्येकाच्या मदतीला धावून जाण्याची वृत्ती असल्याने एकनाथ लाड यांचा तालुक्यातच नव्हे तर जिल्हाभरात मोठा मित्र परिवार आहे. सर्व जाती,धर्मांना आणि गोरगरिबांना सोबत घेऊन चालत असल्याने आणि पाणीपुरवठा विभागातील आपली जबाबदारी प्रामाणिकपणे निभावत असल्याने गेवराई शहरातील ८० टक्के लोकांशी त्यांचा थेट संपर्क होता. त्यांच्या पत्नी कविताताई लाड या नुकत्याच नगरपालिकेत नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. अंत्यसंस्काराच्या वेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, उपनगराध्यक्ष भगवानराव घुम्बार्डे, नगरसेवक राजेंद्र राक्षसभुवनकर, डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे, नगरसेवक महेश सौंदरमल, भाजपा तालुका अध्यक्ष सचिन दाभाडे, शिवसेना माजी उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव मडके, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, शिवसेना तालुकाप्रमुख अजय दाभाडे, गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, गेवराई पत्रकार संघाचे अध्यक्ष अंकुश आतकरे, अमर लाड, एकनाथ लाड यांच्या पत्नी नगरसेविका कविताताई लाड, मुलगा प्रथमेश लाड, मुलगी प्राजक्ता लाड, यांच्यासह सर्व नगरसेवक, पत्रकार, नगर परिषदचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासह गेवराई शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रुग्ण कल्याण समिती सदस्यपदी प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची निवड

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयाच्या रुग्ण कल्याण



समितीवर अशासकीय सदस्य म्हणून आष्टी येथील जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.आ. सुरेश धस यांच्या शिफारशीनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे यांनी यासंबंधीचे आदेश जारी केले आहेत.ही समिती रुग्णालयातील सेवा-सुविधा अधिक चांगल्या करण्यासाठी, समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि उपलब्ध निधीचा योग्य वापर सुनिश्चित करण्यासाठी कार्यरत असते. नवनियुक्त सदस्याने शासनाच्या आणि समितीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल. हा आदेश तत्काळ प्रभावाने लागू झाला आहे.यांचा कालावधी तीन वर्षे किंवा पुढील आदेश येईपर्यंत यापैकी जे आधी होईल तोपर्यंत असणार आहे.या निवडीबद्दल प्रफुल सहस्त्रबुद्धे यांचे आ. सुरेश धस, माजी आ.साहेबराव दरेकर,सिताराम पोकळे,उत्तम बोडखे,दत्ता काकडे, प्रा.डॉ.विनोद ढोबळे, भीमराव गुरव, संतोष सानप, प्रवीण पोकळे, रघुनाथ कर्डिले, गणेश दळवी, शरद तळेकर,शरद रेडेकर,मनोज पोकळे आदी सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## दिवसा घरफोडी करणाऱ्या अट्टल गुन्हेगारास एलसीबीने ठोकल्या बेड्या

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पोलीस ठाणे पिंपळनेर हद्दीतील कुकुडगाव येथील इंदरराव रामभाऊ नवले हे दि.१२ जानेवारी रोजी त्यांच्या राहत्या घराला कुलूप लावुन बाजार करण्यासाठी कुक्कडगावात गेले असता त्यांच्या राहत्या घराचे कुलुप कोणीतरी अज्ञात चोरट्याने तोडुन घरात ठेवलेली रोख रक्कम चोरून नेली होती. सदर घटनेवरून पोस्टे पिंपळनेर येथे घरफोडीचा गुन्हा दाखल होता. सदर गुन्ह्याचा समातंर तपास स्थानिक गुन्हे शाखा करीत होती.

दि.६ फेब्रुवारी रोजी स्थागुशा येथील पोउपनि खटावकर, पोह/अशोक दुबाले, पोह/सोमनाथ गायकवाड, पोह/बाळु सानप, पोह/विकास राठोड, पोह/अंकुश वरपे, पोअ/अर्जुन यादव, पोअ/२२१० अशफाक सय्यद, पोअ/मनोज परजणे चापोअ/सिध्देश्वर मांजरे यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सदरचा गुन्हा हा सराईत गुन्हेगार भगवान ईश्वर भोसले व त्याचा भाऊ कु-या ईश्वर भोसले दोघे रा.बेलगाव ता. कर्जत जि. आहिल्यानगर हमु नागझरी ता. गेवराई जि.बीड यांनी मिळून केला आहे.




सदर आरोपीपैकी भगवान ईश्वर भोसले हा नागझरी येथे आला आहे. मिळालेल्या बातमी नुसार पथकाने नागझरी येथे जावुन छापा टाकला असता आरोपी नाने भगवान ईश्वर भोसले हा झाडाखाली बसलेले मिळुन आला. त्यास विश्वासात घेवुन त्याच्याकडे विचारपुस केली असता त्याने पोस्टे पिपळनेर गुरन. ०८/२०२६ कलम ३०५,३३१ (३) भारतीय न्याय संहिता व पोस्टे आष्टी गुरन. १६/२०२६ कलम ३०५,३३१ (३) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यास ताब्यात घेवुन गुन्ह्याचे पुढील तपास कामी पोस्टे पिपळनेर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे, सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोस्टे पिपळनेर हे करीत आहेत.सदरची कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि खटावकर, पोह/अशोक दुबाले, पोह/सोमनाथ गायकवाड, पोह/बाळु सानप, पोह/विकास राठोड, पोह/अंकुश वरपे, पोअ/अर्जुन यादव, पोअ/२२१० अशफाक सय्यद, पोअ/मनोज परजणे चापोअ/सिध्देश्वर मांजरे यांनी केली आहे.

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळांमध्ये स्नेहसंमेलन झाली पाहिजेत-यशराज पंडित

गेवराई । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण, वकृत्व गुण आणि शिस्त वाढवण्यासाठी प्रत्येक शाळेत स्नेहसंमेलन झाली पाहिजेत. कारण या स्नेहसंमेलनामध्ये विविध क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य पद्धतीचा वाव मिळतो. क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांसह विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष देऊन आपले भविष्यातील ध्येय निश्चित करून त्या मार्गाने वाटचाल करावी. शिक्षणाशिवाय भविष्यात पर्याय नाही असे सांगून, माहिती तंत्रज्ञानाकडेही विद्यार्थ्यांनी लक्ष देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन भाजपा युवा नेते यशराज पंडित यांनी केले आहे.

शोभादेवी महिला सेवाभावी संस्था संचलित अहिल्याबाई होळकर विद्यालय खांडवी येथे दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले याप्रसंगी ते कार्यक्रमाध्यक्ष



म्हणून म्हणून बोलत होते. या स्नेहसंमेलनात शालेय मुला मुलींनी विविध गीतांवर बहारदार नृत्य सादर केली. गीत गायन आणि नाटिका यामधून बालकलावंतांनी सर्व प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. शाळेचे मुख्याध्यापक केशव तळेकर यांनी आपल्या प्रास्ताविकात, यावर्षी शाळेमध्ये शैक्षणिक सहल क्रीडा महोत्सव, आनंदनगरी आदींसह विविध उपक्रम घेण्यात आल्याचे सांगून स्नेहसंमेलन यातून विद्यार्थ्यांच्या अंगीकृत कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न केला असल्याचे म्हटले. याप्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी नांदुरकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश काटकर, केंद्रप्रमुख अण्णासाहेब लोणकर, प्रशासकीय अधिकारी प्रमोद देसले, कैलास शिंदे, लहू भोले, अनिल थोरात, सचिन आडे, दादाराव नाईकवाडे, प्रकाश भोले, रामा गांजले, सचिन भोले, महेंद्र भोले, शेख नूर, शेजुळ आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास महिला व पुरुष गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांनी विविध कार्यक्रमांना टाळ्या वाजवून साथ देत बालकलावंतांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किसन बांगर यांनी केले.

## पान ६ वरुन...

### सोलापूरचे ३३ काळविट नैसर्गिक

पहिले पाऊल म्हणून या ठिकाणी ३३ काळवीट ३३ काळवीट जातीच्या हरणास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले आहे.

सदरच्या ग्रॅसलँड सफारीचा प्रकल्प मराठवाड्यासारख्या डोंगराळ भागात पहिलाच प्रयोग असून या प्रकल्पातुन जैवविविधतता वाढवणे तसेच वनाचे संरक्षण व संवर्धन करण्याचा हेतू आहे. सदर प्रकल्प राबवल्यामुळे प्रकल्प क्षेत्रामध्ये विविध गवत प्रजातीची लागवड करून त्या ठिकाणी वन्य प्राण्यांना पानवठे निर्माण करण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे जंगलातील प्राणी जंगलातच राहतील आणि पर्यायाने जंगल शेजारील शेतकऱ्याच्या शेतातील पिकांचे वन्यप्राण्यामुळे नुकसान होणार नाही.तसेच या क्षेत्रालगत मराठीचे आद्यकवी स्वामी मुकुंदराजांचे समाधी मंदिर, जोगेश्वरी देवीचे मंदिर, संत दासोपंत यांची समाधी, बुट्टेनाथ मंदिर, किरमानी दर्गा, मौलाली दर्गा, हत्तीखाना, बाराखांबी मंदिर लेणी, आकर्षक नृत्य असलेले संकलेश्वर मंदिर, जैन लेण्या तसेच परळी येथे बारा ज्योतिर्लिंग पैकी असलेले प्रभू श्री वैद्यनाथ महादेवाचे मंदिर इत्यादी धार्मिक तसेच ऐतिहासिक मंदिर व वास्तू असल्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटक व भाविकांची संख्या अधिक असल्यामुळे या सफारीचा निश्चितच पर्यटकांना लाभ होईल तसेच स्थानिक लोकांना यापासून रोजगार निर्मिती सुध्दा होईल असे विभागीय वन अधिकारी (प्रा.) बीड यांनी नमूद केले आहे.

### संत श्री गजानन महाराज

भाविकांसाठी महापंगतीचे आयोजन करण्यात आले आहे. भक्तांच्या सहकार्य व देणगीतून मंदिराचा मोठ्या प्रमाणात जीर्णोद्धार करण्यात आला असून मंदिर अधिक सुंदर व आकर्षक स्वरूपात उभे राहत आहे. या सर्व कार्यक्रमांमुळे सहयोग नगर परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला असून भाविकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

### मनरेगातील कंत्राटी कर्मचारी

सर्वांगीण विकास साधण्याचे आणि प्रत्येक कुटुंबाला रोजगाराची हमी देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य गेल्या १४ वर्षांपासून कंत्राटी अधिकारी व कर्मचारी प्रभावीपणे करत आहेत. मनरेगा योजना महाराष्ट्र राज्यात तसेच राष्ट्रीय स्तरावरही अग्रस्थानी आहे. हे कंत्राटी कर्मचारी मंत्रालय, आयुक्तालय, विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, वन विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, कृषी विभाग, रेशीम उद्योग विभाग अशा विविध शासकीय कार्यालयांमध्ये राज्य एमआयएस समन्वयक, राज्य तांत्रिक समन्वयक, अतिरिक्त एमआयएस समन्वयक, सहायक राज्य एमआयएस समन्वयक, कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा एमआयएस समन्वयक, सहायक कार्यक्रम अधिकारी, पॅनल तांत्रिक सहायक, लिपिक-सह-डेटा एंट्री ऑपरेटर आणि इतर पदांवर कार्यरत आहेत. तथापि, शासनाने यापूर्वी समकक्ष योजनांमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याबाबत किंवा सेवा संरक्षण देण्याबाबत निर्णय घेतलेले असल्याने, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या मागण्या

१) इतर समकक्ष योजनांप्रमाणेच, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत नियमित/समायोजित करण्यात यावे. २) एस-२ इन्फोटेक कंपनीमार्फत मनरेगा अंतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांची होणारी अनधिकृत व बेकायदेशीर भरती प्रक्रिया तात्काळ थांबवण्यात यावी आणि सदर कंपनी रद्द करण्यात यावी. त्याऐवजी, सर्व कर्मचाऱ्यांची नियुक्ती राज्य निधी संघटनेमार्फत (सोसायटी) करण्यात यावी आणि समान कामासाठी समान वेतन हे धोरण लागू करण्यात यावे. ३. इतर विभागांप्रमाणेच मनरेगा विभागासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून प्रत्येक पदासाठी संवर्ग रचना तयार करण्यात यावी, जेणेकरून कार्यरत अधिकारी व कर्मचारी अधिक प्रभावीपणे आणि कार्यक्षमतेने आपले कर्तव्य बजावू शकतील.या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून आपल्या स्तरावर योग्य तो सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती बदामराव पंडित यांनी केली आहे.

### घरफोडी प्रकरणात

राहते घराचे कुलुप तोडुन आतमध्ये प्रवेश करुन ०२ अज्ञात ईसमांनी घरातील नगदी रोख रक्कम ४,००,०००/- (चार लाख रुपये) व सोन्या चांदीचे दागीने अंदाजे किमंत ७,०७०००/- असा एकुन ११,७०००/- रुपायाचा माल चोरुन नेला आहे वैगरे फिर्याद वरुन पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहर गुरनं ३४/२०२६ कलम ३३१(४), ३०५, ११२, ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयात तात्रीक तपास करुन नमुद गुन्हयात सहभागी असणारे आरोपी पठाण मोहम्मद रियाज खॉन मोहम्मद ईकबाल मोहम्मद वय २५ वर्षे, रा. बाराभाई गल्ली अंबाजोगाई ,सलमान मुस्तफा शेख वय ३१ वर्षे, रा. झारेगल्ली गल्ली अंबाजोगाई यांची नावे निष्पण्ण केले.

यातील आरोपी नामे पठाण मोहम्मद रियाज खॉन मोहम्मद ईकबाल मोहम्मद वय २५ वर्षे, रा. बाराभाई गल्ली अंबाजोगाई यास गुन्हा दाखल झाल्यापासुन २४ तपासाच्या आत मध्ये दिनांक ३०/०१/२०२६ रोजी अटक करुन नमुद गुन्हयातील नगदी रोख रक्कम १,९०,०००/- रुपये व सव्वा तोळे सोन्याचे गलसर किमंत अंदाजे ६०,०००/- रुपये असा एकुन २,५०,०००/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केला. तसेच यातील आरोपी नामे सलमान मुस्तफा शेख वय ३१ वर्षे, रा. झारेगल्ली गल्ली अंबाजोगाई यास दिनांक ०१/०२/२०२६ रोजी अटक करुन त्याचे कडुन गुन्हयातील गेल्या माला पैकी ५२ ग्रॅम सोने व ५३७ ग्रॅम चांदी असा एकुन ३६०,०००/- रुपायाचा माल हस्तगत केला आहे गुन्हयातील गेल्या माला पैकी एकुन ६,१०,०००/- (सहा लाख दहा हजार रुपये) चा माल हस्तगत केला असुन गुन्हयातील दोन्ही आरोपी हे पोलीस कस्टडी मध्ये असुन गुन्हयाचा पुढील तपास चालु आहे.

सदरची कार्यवाही हि नवनित कॉंवत, पोलीस अधिक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, ऋषीकेश शिंदे, सहाय्यक पोलीस अधिक्षक उपविभागीय अंबाजोगाई, यांचे मार्गदर्शनाखाली शरद जोंगदंड , पोलीस निरीक्षक अंबाजोगाई शहर, पोउपनि अनंद शिंदे, पोलीस कर्मचारी अमोल गायकवाड, श्रीकृष्ण वडकर, तेजस वाव्हुळे, पांडुरंग काळे, हनुमंत चादर, युवराज राठोड, सुशांत गायकवाड, भागवत नागरगोजे यांनी केली असुन पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे करत आहेत.

## भाषा माणसाला समृद्ध बनवते -डॉ.शेंडगे

**माजलगाव । प्रतिनिधी**

**शिक्षण म्हणजे ज्ञान आत्मसात करणे होय.भाषा बोलण्याचे एक कौशल्य असते. श्रवण,संभाषण (संवाद), वाचन , लेखन यातुन भाषा कौशल्य साध्य होते.भाषा माणसाला समृद्ध बनवते असे प्रतिपादन सुंदराराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्यावतीने दोन दिवसीय शिबिरात बोलताना डॉ.सुधाकर शेंडगे यांनी व्यक्त केले.**

सुंदराराव सोळंके महाविद्यालयात दि ५ व ६ फेब्रुवारी रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे.शिबिराचे




उद्घाटन आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ सुधाकर शेंडगे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ.एम. ए.कव्हळे होते.यावेळी समन्वयक डॉ बालाजी बोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ सुधाकर शेंडगे म्हणाले की, स्वतःच्या पायावर उभाराने हीच शिक्षणाचे खरी यशस्वीता आहे. पुस्तकाच्या पलीकडचे जीवन आपल्याला समजले पाहिजे.

अध्यक्षीय समारोप डॉ.एम.ए.कव्हळे यांनी आजीवन शिक्षण व विस्तार याविषयी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. बालाजी बोडके यांनी केले. सूत्रसंचालन डॉ गणेश मोकासरे यांनी केले तर आभार डॉ बिलास काळे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी - विद्यार्थिनी , प्राध्यापक यांची उपस्थिती.

## खादी ग्रामोद्योगच्या स्वयंरोजगाराभिमुख कोर्ससाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**बीड । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय अंतर्गत खादी आणि ग्रामोद्योग आयोग, त्र्यंबक विद्या मंदिर ,नाशिक येथील २६२ एकर निसर्गरम्य परिसर,अद्यावत क्लासरूम्स, उच्च दर्जाच्या तांत्रिक प्रयोगशाळा, प्रात्यक्षिक शेड, आधुनिक मशनरी, तज्ज्ञांचे उत्कृष्ट मार्गदर्शन असलेल्या खादी आणि ग्रामोद्योग पुरस्कार प्राप्त प्रशिक्षण केंद्रातील अभ्यासक्रमास प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून अभ्यासक्रम पुढील प्रमाणे आहेत. बेकरी उत्पादने बनवण्याचे प्रशिक्षण( एक महिना),लाकडी घाण्यावर विविध बियांचे तेल काढणे प्रशिक्षण( पंधरा दिवस), विविध मसाले बनविणे प्रशिक्षण( पंधरा दिवस ),फळे आणि भाजीपाल्यावर प्रक्रिया करणे प्रशिक्षण (पंधरा दिवस), टेलरिंग आणि रेडिमेड कपडे बनविणे प्रशिक्षण (एक महिना), आंघोळ व कपडे धुण्याचा साबण आणि डिटर्जंट पावडर/ अगरबत्ती/ फिनाईल बनविणे प्रशिक्षण (पंधरा दिवस), कॉम्प्युटर टेली )डाटा एन्ट्री/ हार्डवेअर/ सॉफ्टवेअर प्रशिक्षण( एक महिना), प्राकृतिक कलर/पेंट (बायोपेंट) बनविणे प्रशिक्षण (एक आठवडा) मोबाईल रिपेरिंग (एक आठवडा), बेसिक ब्युटीशियन (एक महिना), जीएसटी प्रॅक्टिशनर (तीन दिवस), कुंभार काम प्रशिक्षण( एक आठवडा), छात्र वृत्ती/ स्टायपेंड आधारित अभ्यासक्रम पुढील प्रमाणे, खादी विकास योजना- खादी सूत कताई प्रशिक्षण ( एक महिना) खादी बुनाई प्रशिक्षण( एक महिना), ग्राम उद्योग विकास योजना- लाकडी घाण्यावर विविध बियांचे तेल काढणे( एक महिना), बांबूपासून विविध वस्तू बनविणे( एक महिना), मधमाशीपालन प्रमाणपत्र प्रशिक्षण ( एक महिना ),प्रत्येक बॅच करिता मर्यादित २० प्रशिक्षणार्थींची संख्या निर्धारित केलेली आहे. प्रशिक्षणार्थी लक्ष्य संख्या विविध कोर्स साठी वेगवेगळी आहे. प्रथम आलेल्या प्रशिक्षणार्थींना प्राधान्य दिले जाईल. कोर्स रजिस्ट्रेशन फोनवर( ०२५३-२९७००७१) अथवा :. वर करता येईल. प्रवेशास वयोमर्यादा कमीत कमी १६ वर्ष, शैक्षणिक पात्रता कमीत कमी आठवी पास असावी, ज्या प्रशिक्षणार्थींना वस्तीगृहात प्रवेश पाहिजे असेल त्यांना मात्र पाचशे रुपये प्रति महिना प्रवेश शुल्क आकारण्यात येईल, पंतप्रधान रोजगार निर्मिती योजनेबद्दल सविस्तर माहिती व मार्गदर्शन करण्यात येईल तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्राचार्य खादी आणि ग्रामोद्योग आयोग, त्र्यंबक विद्यामंदिर, नाशिक येथे इच्छुक विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या अभ्यासक्रमासाठी संपर्क साधण्याचे आवाहन शिक्षण व करिअर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे बीड यांनी केले आहे.

## इंडियन मेडिकल असोसिएशनच्या राज्यस्तरीय सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन-डॉ. इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

इंडियन मेडिकल असोसिएशनचा सांस्कृतिक समितीच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय कलादर्पण महोत्सव यावेळी अंबाजोगाई (जि.बीड) येथे रविवार, दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी हॉटेल परिचय हॉल येथे दुपारी २.३० ते ६.३० या वेळेत संपन्न होणार असल्याची माहिती सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

इंडियन मेडिकल असोसिएशन द्वारा दरवर्षी महाराष्ट्रभरातील सर्व सभासद डॉक्टरांसाठी विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यामधील विजेत्या स्पर्धकांना या राज्यस्तरीय कलादर्पण सोहळ्यामध्ये पारितोषके देण्यात येतात. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध डॉक्टर्स उस्फूर्तपणे सहभाग घेत असतात आणि या राज्यस्तरीय स्पर्धेतील विजेते स्पर्धक आपापल्या कला कला दर्पणच्या मंचावर सादर करीत असतात. या कार्यक्रमाला महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यातून विविध डॉक्टर्स कलाकार आपली उपस्थिती दर्शवीत असतात. या समितीचे राज्यअध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी मागील ३ वर्षांपासून हा कार्यक्रम प्रत्येक डॉक्टर्स पर्यंत पोहोचावा यासाठी आटोकाट प्रयत्न केल्याचे या स्पर्धेतील डॉक्टरांच्या सहभागामुळे दिसत आहे. कलादर्पण महोत्सवात डॉ.इंगोले यांच्या अभिनव संकल्पनेतून ताण-तणावात, रूग्णांच्या गर्दीत आपले आयुष्य जगणाऱ्या डॉक्टरांना त्यांच्या आयुष्यात विरंगुळा म्हणून या स्पर्धा आयोजित करीत असल्याचे मत डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी व्यक्त केले. प्रत्येक माणूस हा आपल्या आयुष्यामध्ये संसारामध्ये व्यस्त असतो. पण, प्रत्येक माणसांमध्ये कुठली ना कुठली कला असते. डॉक्टर हा देखील एक माणूस असतो तो ही एक कलाकार असतो मात्र वेळेअभावी या सर्व छंदांना नाईलाजाने कुठलेही दर्जेदार व्यासपीठ नसल्यामुळे ही डॉक्टर्स कलाकार मंडळी आपल्या कला छंद जोपासताना दिसून येत नाहीत. अति ताणतणावामुळे प्रत्येक डॉक्टरच्या आयुष्यामध्ये या कलांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे कारण पैसा हा माणसाची



भूक मिटवू शकतो परंतु एखादी कला छंद हा माणसाला आयुष्याला जगण्याचा अर्थ प्राप्त करून देतो असे मत मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी व्यक्त केले. कला दर्पण या महोत्सवात गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, फोटोग्राफी स्पर्धा, नाट्य स्पर्धा रील्स स्पर्धा याचे आयोजन केले जाते व या मधील विजेत्यांना कलादर्पण या इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक मंचावर या कला सादर करण्याची संधी व पारितोषिक दिले जाते अशी माहिती डॉ.इंगोले यांनी यावेळी दिली. यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी यांनी इंडियन मेडिकल असोसिएशनचा कला दर्पण हा कार्यक्रम मागील ३ वर्षांपासून अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम ठरला आहे. अवघ्या महाराष्ट्रातील डॉक्टर्स या कला दर्पण महोत्सवाची आतुरतेने वाट पाहत असतात. डॉ.राजेश इंगोले यांनी सांस्कृतिक समितीचे अध्यक्षपद घेतल्यापासून हा कार्यक्रम एका वेगळ्या वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवला आहे. महाराष्ट्रातून शेकडो डॉक्टर्स या स्पर्धेमध्ये सहभागी होतात आणि आपल्या कला सादर करतात. हा कार्यक्रम डॉक्टर्स कलाकारांसाठी एक पर्वणी ठरली आहे. अशी माहिती डॉ.संतोष कुलकर्णी यांनी यावेळी देत डॉ.राजेश इंगोले हे या पदाला योग्य न्याय देत सांस्कृतिक समितीचे कार्य धडाडीने पुढे नेत आहेत त्यामुळे त्यांना सलग तीन वर्ष या पदाची जबाबदारी देण्यात आली आहे असे गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संघटनेचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी, तेलबिया महामंडळाचे अध्यक्ष तथा अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर (पापा) मोदी, उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे, अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, तहसीलदार विलास तरंगे, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, संघटनेचे राज्य सचिव डॉ.विक्रांत देसाई कोषाध्यक्ष अमोल गित्ते राज्य उपाध्यक्ष डॉ.कल्याण बरमदे, राज्य सहसचिव डॉ.अनुपम टाकळकर, समिती उपाध्यक्ष डॉ.पल्लवी दोडके, समन्वयक डॉ.तुकाराम मुंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कला दर्पण महोत्सवाच्या यशस्वितेसाठी सर्व राज्य पदाधिकारी, सांस्कृतिक समितीचे राज्य सदस्य तसेच अंबाजोगाई स्थानिक शाखेचे अध्यक्ष डॉ.राहुल धाकडे सचिव डॉ.उद्धव शिंदे, उपाध्यक्ष डॉ.विजय लाड, कोषाध्यक्ष डॉ.बळीराम मुंडे यांच्यासह राज्य कार्यकारिणी समिती सदस्य डॉ.योगेश मुळे, डॉ.प्रज्ञा किनगावकर, डॉ.नवनाथ घुगे, डॉ.सचिन पोतदार, डॉ.इमरान पटेल, डॉ.सचिन चाटे परिश्रम घेत आहेत.

# सरकारच्या तिजोरीवर पहिला हक्क शेतकऱ्यांचा - एकनाथ शिंदे



ओतूर । प्रतिनिधी

सरकारच्या तिजोरीवर पहिला अधिकार हा शेतकऱ्यांचा आहे. या विचारानेच आम्ही नैसर्गिक आपत्तीमधील नुकसानीचे निकष बदलून शेतकऱ्यांना ३२ हजार कोटींचे पॅकेज दिले आहे.

जुन्नर तालुकादेखील शेतीसमृद्ध परिसर आहे. शेतकऱ्यांच्या मुलांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागू नये, म्हणून समृद्ध शेती आणि पर्यटन विकासातून रोजगार निर्मितीवर भर देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ओतूर येथील सभेत केले. जुन्नर तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारार्थ येथे आयोजित सभेत उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. या वेळी आमदार शरद सोनवणे यांच्यासह उमेदवार उपस्थित होते. या वेळी उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, ''जुन्नर तालुका शेतीप्रधान असून, विविध तंत्रज्ञानांच्या वापरातून शेती अधिक समृद्ध करण्यावर शासनाचा भर आहे. यासाठी आता एआय तंत्रज्ञानाला प्रोत्साहन दिले जात असून, शेतीवर प्रक्रिया करून, मूल्यवर्धन करण्यासाठी डुंबरवाडी (ओतूर) येथे फूड प्रोसेसिंग प्लाझा उभारण्यात येणार आहे. शेतीसह जुन्नर पर्यटनासाठी समृद्ध असून, प्राचीन लेणी, गड किल्ले आणि पश्चिम घाटाचे सौंदर्य जुन्नरला लाभले आहे. तालुक्यातील विविध पर्यटनस्थळांच्या विकासातून रोजगार निर्मितीवर शासनाचा भर आहे. यासाठी पर्यटनमंत्री शंभुराज देसाई यांच्यासोबत बैठक घेऊन, पर्यटन विकासाची कामे मार्गी लावण्यात येतील. वाढत्या शहरीकरणामुळे ओतूर आणि नारायणगाव ग्रामपंचायती नगरपंचायतींमध्ये रूपांतरित कराव्यात, अशी मागणी आमदार शरद सोनवणे यांनी केली. आचारसंहिता संपल्यावर यासंदर्भातील प्रक्रिया सुरू केली जाईल, असे शिंदे यांनी या वेळी सांगितले. नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तीर्थक्षेत्र पारुंडे येथेदेखील भाविक हजेरी लावतील. या क्षेत्राच्या विकासासाठी २४० कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. लवकरच या आराखड्याला मंजुरी दिली जाईल, असे शिंदे यांनी सांगितले.

## शेळ्या-मेंढ्यांमध्ये अचानक मरतूक? एका लसीमुळे वाचू शकते प्राण



शेळ्या व मेंढ्यांमध्ये आढळणारा देवी (पॉक्स) आजार हा पॉक्स विषाणूमुळे होणारा अतिशय संसर्गजन्य आणि गंभीर आजार आहे. हा आजार एका जनावराकडून दुसऱ्या जनावरात फार वेगाने पसरतो. विशेषतः जानेवारी ते एप्रिल या कालावधीत या आजाराचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. वेळेवर प्रतिबंधात्मक उपाययोजना न केल्यास या आजारामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते.

असे आहे आजाराचे स्वरूप : या आजाराची सुरुवात जनावरांच्या शरीरावर लालसर पुरळ येण्यापासून होते. ही पुरळ प्रामुख्याने कान, तोंड, कास, सड, शेपटीखालचा भाग, पोट तसेच त्वचेच्या मऊ भागांवर दिसते. काही दिवसांत या पुरळांमध्ये पू साचतो व ते पिवळसर रंगाचे होतात. पुढे याच गाठी खपल्यामध्ये बदलतात. यामुळे जनावरांना वेदना होतात, खाणे-पिणे कमी होते आणि जनावरे अशक्त बनतात.प्रौढ शेळ्या व मेंढ्यांमध्ये या आजारामुळे साधारण ५ ते १० टक्के मरतूक आढळते. मात्र करडे व कोकरांमध्ये हे प्रमाण अधिक असून कधी-कधी मोठ्या प्रमाणावर मृत्यू होण्याची शक्यता असते. त्यामुळे या आजाराकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते.

असे मिळवा नियंत्रण : या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी लसीकरण हाच सर्वात महत्त्वाचा उपाय आहे. मेंढ्यांसाठी शीप पॉक्स लस आणि शेळ्यांसाठी गोट पॉक्स लस बाजारात सहज उपलब्ध आहे. या लसीमुळे जनावरांच्या शरीरात रोगप्रतिकारक शक्ती निर्माण होते आणि ती साधारण एक वर्षापर्यंत टिकून राहते. त्यामुळे तीन महिन्यांवरील सर्व शेळ्या व मेंढ्यांना दरवर्षी डिसेंबर-जानेवारी महिन्यात, पशुवैद्यकांच्या सल्ल्याने लसीकरण करणे अत्यावश्यक आहे.यासोबतच स्वच्छतेकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. जनावरांचे वाडे, गोठे व वापरातील साहित्य २ टक्के फेनॉल किंवा १ टक्का फॉर्मेलिनच्या द्रावणाने निर्जंतुक करावे. शक्य असल्यास फ्लेम गनच्या साहाय्याने गोठ्याची नियमित निर्जंतुकीकरण प्रक्रिया करावी. आजारी जनावरांच्या संपर्कात आलेला चारा, खाद्य किंवा मृत जनावरे योग्य पद्धतीने पुरून किंवा जाळून नष्ट करावीत.आजारी शेळ्या-मेंढ्यांना किमान दीड महिना कळपापासून वेगळे ठेवावे.

नवीन खरेदी केलेली जनावरे किमान तीन आठवडे वेगळी ठेवून निरीक्षण केल्यानंतरच मूळ कळपात मिसळावीत. तसेच आजाराचा प्रादुर्भाव असलेल्या भागात जनावरांचे स्थलांतर टाळावे.

हा आजार विषाणूजन्य असल्यामुळे त्यावर थेट उपचार उपलब्ध नाहीत. मात्र दुय्यम जंतुसंसर्ग टाळण्यासाठी पशुवैद्यकांच्या सल्ल्याने प्रतिजैविके व वेदनाशामक औषधे ५ दिवस द्यावीत. शरीरावरील जखमा पोटॅशियम परमॅग्नेटच्या द्रावणाने स्वच्छ करून त्यावर जंतुनाशक मलम लावावे.

## मका पिकावरील लष्करी अळीपासून संरक्षण



सध्या राज्यातील अनेक भागांमध्ये रब्बी हंगामातील मक्याची लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे. मात्र अलीकडच्या काळात ढगाळ हवामान, वाढलेली आर्द्रता आणि अवकाळी पावसामुळे मक्याच्या पिकावर विविध किडींचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. यामध्ये सर्वात जास्त नुकसान करणारी कीड म्हणजे लष्करी अळी. ही कीड वेळीच ओळखली नाही तर कमी दिवसांत संपूर्ण शेताचे मोठे नुकसान करू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी या किडीबाबत सतर्क राहणे अत्यंत गरजेचे आहे.ढगाळ हवामानात तापमान फार जास्त किंवा फार कमी नसते, तसेच हवेत ओलावा अधिक असतो. ही परिस्थिती लष्करी अळीच्या वाढीसाठी अत्यंत पोषक ठरते. अशा वातावरणात अळी जलद वाढते, जास्त अंडी घालते आणि कमी वेळात संपूर्ण शेतात पसरते. म्हणूनच ढगाळ हवामान सुरू झाले की मक्याच्या शेताकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

लष्करी अळी अशी ओळखा : लष्करी अळीची ओळख सुरुवातीच्या अवस्थेत करणे खूप महत्त्वाचे आहे. सुरुवातीला या अळ्या समूहाने राहतात आणि कोवळ्या पानांचा वरचा हिरवा भाग खरवडून खातात. पहिल्या व दुसऱ्या अवस्थेत पानांवर छोटे पांढरे ठिपके दिसतात. पुढे अळ्या वेगवेगळ्या होतात आणि मक्याच्या पोंग्यात शिरून आतली पाने खातात. तिसऱ्या ते पाचव्या अवस्थेत पानांवर मोठी छिद्रे दिसू लागतात. सहाव्या अवस्थेत अळी फारच खादाड बनते. ती पोंग्यात लाकडाच्या भुशासारखी विष्ठा टाकते आणि कणसाच्या आवरणाला छिद्र पाडून आतले दाणेही खाते. यामुळे उत्पादनात मोठी घट होते.

नुकसान टाळण्याचे उपाय : लष्करी अळीचे नुकसान टाळण्यासाठी नियमित शेत सर्वेक्षण करणे फार महत्त्वाचे आहे. आठवड्यातून किमान दोन वेळा मक्याची पाने, पोंगे आणि कणसाच्या आजूबाजूचा भाग नीट तपासावा. अळी सुरुवातीच्या अवस्थेत आढळली तर तिचे नियंत्रण करणे सोपे आणि कमी खर्चिक ठरते. उशीर झाल्यास नुकसान वाढते आणि खर्चही अधिक होतो. लष्करी अळीचा प्रादुर्भाव ओळखण्यासाठी कामगंध सापळे उपयुक्त ठरतात. हेक्टरी किमान पाच कामगंध सापळे लावावेत. जर सलग दोन ते तीन दिवस सापळ्यात भुंगेरे आढळले तर त्वरित नियंत्रण उपाय सुरू करावेत. तसेच पोंग्यांवर छिद्रे दिसू लागताच फवारणी करणे आवश्यक आहे.

एकात्मिक कीड व्यवस्थापन : फक्त रासायनिक फवारणीवर अवलंबून न राहता एकात्मिक कीड व्यवस्थापन वापरणे अधिक फायदेशीर ठरते. मोठ्या अळ्या दिसताच त्या हाताने गोळा करून नष्ट कराव्यात. अंडीपुंज जमा करून नष्ट करावेत. शेतात हेक्टरी १५ ते २० कामगंध सापळे लावल्यास प्रादुर्भाव कमी होतो. फवारणी करताना औषध थेट मक्याच्या पोंग्यात जाईल याची काळजी घ्यावी. तसेच पोंग्यात वाळू मिसळलेली राख टाकल्यास अळी नियंत्रणात येण्यास मदत होते.प्रादुर्भावाची टक्केवारी ओळखणेही महत्त्वाचे आहे. शेतातील १०० झाडांपैकी जर ५ झाडांवर अळी दिसली तर तो ५ टक्के प्रादुर्भाव समजावा. मोठ्या शेतात वेगवेगळ्या ठिकाणांहून १०० झाडांची तपासणी करून ही टक्केवारी काढावी. योग्य वेळी उपाययोजना केल्यास मक्याचे पीक सुरक्षित ठेवता येते आणि उत्पादनात वाढ करता येते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### वन अग्नि सुरक्षा दिवस.
### 'ग्रेनाडा'चा स्वातंत्र्यदिन
### व्हॅलेंटाईन आठवड्याला सुरुवात

#### महत्वाच्या घटना

१८५६ : ब्रिटिशांनी अवध साम्राज्य ताब्यात घेतले. सम्राट वाजिद अली शहा याला तुरुंगात टाकण्यात आले.
१९१५ : गंगाधर नरहर ऊर्फ बापुसाहेब पाठक यांनी पुण्यातील 'आर्यन' हे पहिले चित्रपटगृह सुरु केले. तेथे प्रदर्शित झालेला पहिला मूकपट होता हिर्याची अंगठी.
१९२० : बाबूराव पेंटर यांच्या 'महाराष्ट्र फिल्म कंपनी'ने तयार केलेला 'सैरंध्री' हा चित्रपट पुण्याच्या आर्यन सिनेमात प्रथम प्रकाशित झाला.
१९४८ : कसोटी क्रिकेटमधे शतक झळकवणारा नील हार्वे हा सर्वात लहान ऑस्ट्रेलियन खेळाडू ठरला.
१९६५ : मराठी नाटकात प्रथमच फिरत्या रंगमंचाचा वापर सुरू झाला.
१९७१ : स्वित्झर्लंडमधे महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला.
१९७४ : ग्रेनाडा हा देश (युनायटेड किंग्डमपासुन) स्वतंत्र झाला.
१९७७ : सोवियेत संघाने सोयुझ २४ हे अंतराळयान प्रक्षेपित केले.
१९९९ : युवराज अब्दुल्ला जॉर्डनच्या राजेपदी
२००३ : क्रिकेट प्रशिक्षक रमाकांत आचरेकर यांना श्री शिवछत्रपती जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला.
२०१० : आजच्या दिवशी अंतरराष्ट्रीय पुस्तक मेळाव्याचा समारोप झाला.

#### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६९३ : रशियाची सम्राज्ञी ऍना यांचा जन्म.
१८०४ : डिरे अँड कंपनीचे संस्थापक जॉन डिरे यांचा जन्म. (मृत्यू: १७ मे १८८६)
१८१२ : चार्ल्स डिकन्स इंग्लिश कादंबरीकार व लेखक (मृत्यू: ९ जून १८७०)
१८७३ : आरएमएस टायटॅनिक जहाजाचे रचनाकार थॉमस ॲन्ड्रयूज यांचा जन्म. (मृत्यू: १५ एप्रिल१९१२)
१८९८ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांचा जन्म.
१९०६ : रशियन विमानशास्त्रज्ञ अँतोनोव्ह एअरक्राफ्ट कंपनीचे संस्थापक ओलेग अँतोनोव्ह यांचा जन्म. (मृत्यू: ४ एप्रिल १९८४)
१९३४ : सुजित कुमार चित्रपट अभिनेता व निर्माता (मृत्यू: ५ फेब्रुवारी २०१०)
१९३८ : एस. रामचंद्रन पिल्ले कम्युनिस्ट नेते
१९८० : चित्रपट अभिनेत्री प्राची शाह यांचा जन्म.
१९९३ : प्रसिद्ध टेनिसपटू किदंबी श्रीकांत चा जन्म.

#### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२७४ : श्री चक्रधर स्वामी महानुभाव पंथाचे संस्थापक (जन्म: ४ सप्टेंबर १२२१)
१३३३ : निचिरेन शोषु बौद्ध धर्माचे संस्थापक निक्को यांचे निधन.
१९३८ : हार्वे फायरस्टोन अमेरिकन उद्योजक (जन्म: २० डिसेंबर १८६८)
१९४२ : आजच्या दिवशी ''हिंदुस्तान रिपब्लिकन असोसिएशन'' ची स्थापना करणारे शचींद्रनाथ सान्याल यांचे निधन.
१९९९ : हुसेन नवविचारांचा पुरस्कार करुन पश्चिम आशियातील शांततेसाठी अथक प्रयत्न करणारे जॉर्डनचे राजे (जन्म: १४ नोव्हेंबर १९३५)

## बडीशेप लागवड तंत्रज्ञान

भारत प्राचीन काळापासून मसाल्यांच्या भूमीसाठी ओळखला जातो. मुख्य मसाला पिकांमध्ये जिरे, धणे, मेथी, एका जातीची बडीशेप, बडीशेप इत्यादी प्रमुख आहेत. यापैकी एका जातीची बडीशेप हे भारतातील महत्त्वाचे मसाला पीक आहे. रब्बी आणि खरीप या दोन्ही हंगामात याची यशस्वीपणे लागवड करता येते, मात्र खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे पीक निकामी होण्याची शक्यता असते. रब्बी हंगाम हा त्याच्या लागवडीसाठी सर्वोत्तम मानला जातो, कारण या हंगामात कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी असतो आणि पावसामुळे पीक खराब होण्याचा धोका नसतो आणि खरीपाच्या तुलनेत उत्पादनही वाढते.बडीशेपमध्ये पाचक आणि दाहक-विरोधी दोन्ही गुणधर्म असतात. त्यात पोटॅशियम, कॅल्शियम, फॉस्फरस आणि लोह तसेच इथेनॉल, लिमोझिन, फेकन इत्यादी वाष्पशील तेल घटक असतात. याशिवाय बडीशेपमध्ये वेदनाशामक, दाहक-विरोधी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म देखील असतात.

हवामान : बडीशेपच्या चांगल्या उत्पादनासाठी कोरडे आणि थंड हवामान उत्तम आहे. बियांच्या उगवणासाठी योग्य तापमान २०-२९ अंश सेंटीग्रेड आणि पिकाच्या चांगल्या वाढीसाठी १५-२० अंश सेंटीग्रेड तापमान योग्य आहे.

जमीन : बडीशेप लागवडीसाठी वालुकामय जमीन वगळता, इतर सर्व प्रकारची जमीन ज्यामध्ये सेंद्रिय पदार्थ पुरेशा प्रमाणात आणि मातीचा आहे. ६.६ ते ८.० आहे. तिथे अबडीशेपचे पीक चांगले येते. जमीन तयार करणे : जमीन तयार करण्यासाठी प्रथम एक किंवा दोन नांगरणी माती फिरवून नांगरणी करावी. यानंतर माती भुसभुशीत करून शेत सपाट



केल्यानंतर सोयीनुसार बेड तयार करावेत.

सुधारित जाती : आरएफ-१०५, आरएफ-१२५, पीएफ-३५, गुजरात सौन्फ-१, गुजरात सौन्फ-२, गुजरात सौन्फ-११, सीओ-११, हिसार स्वरूप.

पेरणीची वेळ : बडीशेप हे दीर्घ कालावधीचे पीक आहे, त्यामुळे रब्बी हंगामाच्या सुरुवातीला पेरणी केल्यास अधिक उत्पादन घेता येते. एका जातीची बडीशेप थेट शेतात किंवा रोपवाटिकेत रोपे तयार करून लागवड करता येते. ऑक्टोबरचा पहिला आठवडा पेरणीसाठी उत्तम आहे. रोपवाटिकेमध्ये जुलै-ऑगस्ट महिन्यात पेरणी केली जाते आणि ४५-६० दिवसांनी लागवड केली जाते.

बीजप्रक्रिया : पेरणीपूर्वी, बियाण्यांवर बुरशीनाशक बाविस्टिन (दर २ ग्रॅम प्रति किलो बियाणे) किंवा सेंद्रिय बुरशीनाशक ट्रायकोडर्मा (८-१० ग्रॅम प्रति किलो बियाणे) सह प्रक्रिया करून पेरणी करा.

अन्नद्रव्य व्यवस्थापन : बडीसोपच्या अधिक आणि चांगल्या उत्पादनांसाठी हेक्टरी १५ ते २० टन सेंद्रिय खाते लागवडीपूर्वी शेवटच्या वखराच्या पाळीसोबत जमिनीत मिसळून द्यावी तसेच रासायनिक खतानासुद्धा बडीसोप हे पिक अधिक चांगला प्रतिसाद देते असे सिद्ध झाले आहे. हेक्टरी ९० किलो ग्रॅम नत्र ४० किलो ग्रॅम स्फुरद आणि जमिनीच्या आवश्यकतेनुसार पालाश यांची मात्रा विभागून पिकाला दिल्यास उत्पादनावर अतिशय चांगला परिणाम दिसून येतो. नत्रयुक्त खतांची अर्धी व स्फुरदयुक्त खताची पूर्ण मात्रा लागवडीनंतर ३० दिवसांनी आणि उरलेली नत्राची आर्धी मात्र लागवडीपासून ६० दिवसांनी पिकला द्यावी.

पाणी व्यवस्थापन : बडीसोपला पाणी व्यवस्थापन काळजीपूर्वक करणे गरजेचे आहे. लागवडीच्या वेळेस जर जमिनीत ओलावा कमी असेल तर हलके ओलीत करावे. यानंतर जमिनीचा मगदूर आणि वातावरण लक्षात घेऊन १०-१२ दिवसांच्या अंतराने पिकाला पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.

किड व रोग व्यवस्थापन : बडीसोपवर मोठ्या प्रमाणावर कीड किवा रोगाचे अतिक्रमण होत नाही. परंतु दमट हवामान व अतिशय थंडी यामुळे मावा या किडीचा पिकावर उपद्रव होऊ शकतो. या किडीच्या नियंत्रणाकरिता डायमेथोएट ३५ टक्के प्रवाही १० मी.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पिकावर फवारावे. तसेच थंडीच्या कालावधीत दहिया या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास त्याच्या नियंत्रणासाठी पाण्यात मिसळणारी गंधकाची भुकटी २० टक्के तीव्रतेची २ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून पिकावर फवारावी.

काढणी व्यवस्थापन : बडीसोपच्या दाण्याच्या आकारावरून त्याची चव ठरत असते. साधारणपणे पूर्ण परिपक्व दाण्याच्या आकाराच्या निम्म्या आकाराची बडीसोप चवीला गोड व स्वादिष्ट असते. त्यामुळे अशा प्रकारची बडीसोप काढणीस, फुले येणा-या दिवसापासून ३०-४० दिवसांनतर तयार होते. यावेळी पिक पिवळे होण्यास सुरुवात होते. अशा वेळेस उपरोक्त अवस्थेतील फांद्या, त्यावरील अंबेल काढून त्यांना सावलीत बांदल बांधून सुकवतात. चांगल्या प्रतीची बडीसोप उत्पादनाकरीता परीपक्वतेच्या आधारावर पिकाचे ५-६ तोडे घेणे गरजेचे असते.

उत्पन्न : साधारणपणे वरीलप्रमाणे शास्त्रीय पद्धतीचा वापर करून बडीसोपची जिरायती शेती केल्यास हेक्टरी १५-१७ क्विंटल उत्पन्न मिळू शकते. लखनवी बडीसोपचे म्हणजे स्वादिष्ट आणि गोड चवीच्या बडीसोपचे प्रती हेक्टरी ५-७.५ क्विंटल एवढे उत्पादन मिळू शकते.

## जनावरांची शिंगे वेळीच कापा, नाहीतर आजाराचा धोका!

प्राण्यांची शिंगे त्यांच्यासाठी अनेक कार्ये करतात. प्राणी त्यांच्या शिंगांचा वापर लढण्यासाठी आणि स्वतःचे संरक्षण करण्यासाठी करतात. पण बघितले तर त्यांच्या शिंगांचे जितके फायदे आहेत तितकेच तोटेही आहेत. प्राण्यांची शिंगे कापण्याला शास्त्रज्ञांच्या भाषेत डी-हॉर्निंग असेही म्हणतात. जनावरांचे शिंगे कापले नाही तर ते मनुष्यप्राण्यांसाठी जेवढे धोकादायक आहेत तेवढेच ते जनावरांसाठी सुद्धा हानिकारक आहे.

शिंगांमुळे जनावरांना धोकादायक आजार : मोठ्या आणि लांब शिंगे असलेल्या प्राण्यांना सर्वात धोकादायक आजार झाल्याचे अनेकदा दिसून आले आहे. शिंगाच्या पेशी प्राण्यांमध्ये अनावश्यकपणे वाढतात, जे प्राण्यांच्या आरोग्यासाठी हानिकारक आहे. वास्तविक, अशा परिस्थितीत शिंगे लवकर मऊ होऊ लागतात आणि नंतर हळूहळू एका बाजूला लटकू लागतात. त्यामुळे प्राण्यांच्या डोक्यात खूप वेदना होतात आणि ही वेदना कायम राहते. याचा परिणाम असा होतो की प्राण्याचे डोके एका बाजूला झुकते. काही दिवसांनी शिंग स्वतःच तुटून पडते. अशा स्थितीत जनावराच्या डोक्याच्या आतील बाजूस एक जखम राहते. यासोबतच प्राण्याच्या डोक्याचे मांसही हळूहळू कुजते. काही दिवसात या जखमेत जंत येऊ लागतात, जे कॅन्सरचे रूप घेतात. यावर वेळीच उपचार न मिळाल्यास जनावराचा मृत्यू निश्चित आहे. प्राण्यांच्या शिंगांवर एक जाड थर असतो, त्याला कवच म्हणतात हे तुम्ही अनेकदा पाहिले असेल. शिंगाच्या आजूबाजूच्या भागात प्राण्यांच्या आपसी भांडणामुळे, खाज सुटणे आणि इतर अनेक आजारांमुळे किंवा शिंग कुठेतरी अडकल्यास हे कवच बंद होते. अशा स्थितीत जनावराच्या डोक्यातून भरपूर रक्त बाहेर पडते, जे घरगुती उपायांनी अजिबात बरे होत नाही. अशा स्थितीत पशुपालक बांधवांनी आपल्या जनावरांना ताबडतोब जवळच्या डॉक्टरांकडे न्यावे. अनेक प्राण्यांची शिंगे वाढून मागून वळतात आणि प्राण्यांच्या डोक्यात किंवा कानाजवळच्या जागेत शिरतात, असेही आढळून आले आहे. जे प्राण्यांसाठी धोकादायक आहेत. वरील सर्व परिस्थिती टाळण्यासाठी जनावरांची शिंगे वेळोवेळी कापली पाहिजेत. काही प्राण्यांची शिंगे कापणीनंतर खूप सुंदर दिसतात हे तुम्ही अनेकदा पाहिले असेल. काही पशुपालक त्यांच्या जनावरांना सुंदर आणि अद्वितीय दिसण्यासाठी शिंग कापण्याबरोबरच त्यांना रंगीबेरंगी रंगही देतात. त्यामुळे तुमचे जनावर सुंदर दिसावे आणि त्यांना लांब शिंगांमुळे हानी होऊ नये म्हणून वेळोवेळी ही शिंगे कापत राहा.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत





# बाल मजूरीविरोधात तातडीने धाडसत्र राबवा-जिल्हाधिकारी

जालना। प्रतिनिधी

बाल किशोरवयीन कामगार निर्मुलनासाठी राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगाने दि.२६ जानेवारी ते ३१ मार्च २०२६ या तीन महिन्याच्या कालावधीसाठी संपूर्ण भारतात बचाव आणि पुर्नवसन मोहीम आयोजित केली आहे. तरी जालना जिल्ह्यातील बाल आणि किशोरवयीन कामगारांची तसेच रस्त्यावरील मुलांची ओळख पटविणे, त्यांची सुटका करणे, जिल्ह्यातील हॉट स्पॉटची निवड करुन धाडसत्राचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी पोलिस विभागाने जिल्ह्यातील बालकामगार मुक्त करण्यासाठी आपली यंत्रणा कार्यान्वित करावी. तसेच जालना जिल्हा बाल कामगार मुक्तीसाठी बाल मजूरीविरोधात तातडीने धाडसत्र राबवावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात दुरदृष्य प्रणालीद्वारे जालना जिल्हा कॉपीमुकत अभियान व बालकामगार शोध मोहीम विषयक बैठक पार पडली. याप्रसंगी त्या बोलत होत्या. या निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, पोलिस उपअधिक्षक रविंद्र निकाळजे, शिक्षणाधिकारी बाळु खरात, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी



गजानन इंगळे, सर्व यांच्यासह संबंधित यंत्रणेचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, बालमजूरी प्रथा समुळ उच्चाटन करुन बाल मजूरांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात समाविष्ठ करणे अत्यंत गरजेचे आहे. बाल कामगार (प्रतिबंध व निर्मूलन) अधिनियम १९८६ कायद्यान्वये १४ वर्ष पुर्ण न केलेल्या बालकास धोकादायक उद्योग आणि प्रक्रियांमध्ये कामावर ठेवण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. बाल कामगार मुक्तीबाबत दररोज कारवाई होणे अपेक्षित असून सर्व पोलिस ठाण्याच्या प्रमुखांनी आपल्या हद्दीतील किमान ५ बाल कामगार शोधून त्यांचे पुर्नवसन करावे. धोकादायक उद्योगातील १४ वर्षाखालील बाल मजूरांच्या मुक्ततेसाठी धाडसत्रे आयोजित करावीत. धाडसत्रात मुक्त करण्यात आलेल्या बाल मजूराच्या पालकांना जर संबंधित मालकाने आगाऊ उचल कोणत्याही कारणास्तव प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दिल्याचे तपासात आढळल्यास, अशा बाल कामगारास वेठबिगार कामगार म्हणून समजण्यात यावे आणि त्यानूसार मालकाविरुध्द कारवाई करावी आणि अशा वेठबिगार बालमजूरास नियमानुसार शासकीय फायदे मिळवून देण्यात यावेत. बालमजूर नियुक्त केलेल्या मालकाविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करुन अशा मालकांकडून प्रति बाल मजूर २० हजार रुपये जिल्हा बाल कल्याण निधीत जमा करुन त्यात शासनाचा हिस्सा ५ हजार रुपये प्रति बाल मजूर जमा करावा. या जमा निधीचा विनीयोग शक्यतो त्याच बाल मजूरांच्या पुनर्वसनार्थ करण्यात यावा. दर आठवड्याला जिल्हा कृती दलाची आढावा बैठक आयोजित करण्यात यावी. बाल मजूरी ही सामाजिक अनिष्ठ प्रथा समुळ नष्ट करण्यासाठी जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबवावी. बालकामगार मुक्त करण्यासाठी योगदान देणाऱ्या, उत्कृष्ट काम करणाऱ्या पोलिसांना बालस्नेही पोलिस पुरस्कार दिला जाईल. बालकामगार कामावर ठेवल्याने बाल कामगाराचे शारिरीक व मानसिक नुकसान होते. बाल कामगारास अत्यंत वेदना होतात व शिक्षणाच्या वयात काम करावे लागल्याने त्यांचे संपूर्ण भविष्य उध्वस्त होत असते. १४ वर्षाखालील मुलांना कामावर ठेवणे हा कायदेशीर गुन्हा असून नागरिकांनी अशा घटना आढळल्यास त्वरित कामगार विभाग अथवा चाईल्ड हेल्पलाईन १०९८ क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## कॉपीमुक्तीसाठी पोलिसांची भुमिका महत्वाची

जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (बारावी) दि.१० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ तर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (दहावी) दि.२० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यात इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी ३७ हजार ३३८ विद्यार्थ्यांसाठी ७९ परीक्षा केंद्र आहेत. इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी ३२ हजार ४३३ विद्यार्थ्यांसाठी १०२ परीक्षा केंद्र आहेत. सर्व परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या देखरेखीखाली होणार असून जिल्ह्यातील संवेदनशील बारावीच्या ८ तर दहावीच्या ४ अशा एकुण १२ परीक्षा केंद्रावर ड्रोन कॅमेऱ्याची नजर राहणार असून चित्रीकरणही करण्यात येणार आहे. जालना जिल्ह्यातील दहावी, बारावीच्या परीक्षा भयमुक्त वातावरणात व पारदर्शक होणे गरजेचे असल्याने जालना जिल्हा कॉपी मुक्तीसाठी पोलिस विभागाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे, तरी जिल्ह्यातील संवेदनशिल परीक्षा केंद्रावर चोख पोलिस बंदोबस्त ठेवून गैरप्रकाराला आळा घालावा. परीक्षा केंद्राच्या परिसरात होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी अतिशय दक्षता बाळगावी. परीक्षा कालावधीत पोलिस विभागाने वेळोवेळी सहकार्य करावे, अशा सुचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दुरदृष्य प्रणालीद्वारे घेण्यात आलेल्या बैठकीत दिल्या. या बैठकीस सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस ठाण्याचे प्रमुख ऑनलाईन पध्दतीने उपस्थित होते.

---

# पप्पा, मला वाचवा ;निवडणुकीपोटी मुलीचा काटा काढणाऱ्या बापाबद्दल संताप

नांदेड । प्रतिनिधी

पप्पा... पप्पा, मला वाचवा... ही आर्त हाक त्या निर्दयी बापाच्या कानी पडली नाही. राजकीय महत्त्वाकांक्षेच्या वेदीवर अवघ्या ६ वर्षांच्या चिमुकलीचा बळी देण्यात आला. मुखेड तालुक्यातील केरुर येथील या घटनेने माणुसकीला काळीमा फासला असून, केवळ निवडणुकीत अपात्र ठरण्याच्या भीतीपोटी पोटच्या मुलीचा काटा काढणाऱ्या या पाषाणहृदयी बापाबद्दल सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

मुखेड तालुक्यातील केरुर येथील पांडुरंग कोंडामंगले याचे शहरात विराट मेन्स पार्लर नावाने मोठे दुकान आहे. हाताला काम आणि घरात सुख-शांती होती. त्याला दोन जुळ्या मुली आणि एक मुलगा अशी तीन अपत्ये होती. मात्र, केरुरचे सरपंचपद ओबीसी महिलेसाठी आरक्षित झाले आणि इथेच त्याच्या सुखी संसाराला दृष्ट लागली.




गावातील पॅनल प्रमुख गणेश शिंदे याने पांडुरंगला हेरले. तुझ्या बायकोला सरपंच करतो, निवडणुकीसाठी १५ लाख रुपये देतो आणि सर्व मदत करतो, असे आमिष शिंदेने दाखवले. मात्र, तीन अपत्ये असल्याने निवडणूक लढवता येणार नाही, हा नियम आडवा आला. यावर तोडगा काढण्यासाठी पांडुरंगने सुरुवातीला एका मुलीला दत्तक देण्याचा किंवा मुलाचा जन्मदाखला लपवण्याचा प्रयत्न केला. वर्षभरापासून त्याच्या डोक्यात सरपंचेपदाचे भूत नाचत होते. पण कायदेशीर पळवाट सापडत नसल्याने अखेर त्याने टोकाचे पाऊल उचलले.

स्वतःची राजकीय भूक भागवण्यासाठी त्याने पोटच्या मुलीचा बळी देण्याचे ठरवले. २९ जानेवारीला त्याने जुळ्या बहिणींपैकी प्राचीला (वय ६) द्वाकीवर बसवले. तेलंगण्यातील येडपल्ली येथील निजामसागर कालव्याजवळ नेऊन तिला निर्दयपणे पाण्यात फेकून दिले. ती चिमुकली पप्पा.. पप्पा म्हणून ओरडत होती, पण बापाचे काळीज पाझरले नाही. गुन्हा करून आपण सुटलो, या भ्रमात तो होता. पण तेलंगणा पोलिसांनी तपास करत त्याला आणि त्याला फूस लावणाऱ्या गणेश शिंदेला गजाआड केले.

---

# बुद्धिमत्ता आणि नीतिमत्ता असेल तर, यश हमखास मिळते-डॉ. मिलिंद पंडित

अंबड। प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी बुद्धिमत्ता आणि नीतिमत्ता जोपासली तर यश हमखास मिळते. सोबतच शिस्त, अभ्यासात सातत्य आणि चांगल्या सवयी आत्मसात कराव्यात असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित यांनी केले ते अंबड येथील मत्स्योदरी महाविद्यालयात बारावी कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून श्री. दिनेश शिनगारे, गटशिक्षणाधिकारी तर उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर उबाळे, पर्यवेक्षक प्रा.पांडुरंग काळे, प्रा. पोपटराव सुरासे, कार्यालयीन अधीक्षक बंडूसाहेब कनके आदींची उपस्थिती होती.गटशिक्षणाधिकारी श्री. दिनेश शिनगारे यांनी बोर्ड परीक्षा संदर्भात कॉपीमुक्त अभियानाची माहिती विद्यार्थ्यांना देऊन, प्रत्येकाने आत्मविश्वासाने परीक्षेस सामोरे जावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पांडुरंग काळे



यांनी कार्यक्रम आयोजनाची भूमिका विषद करून विद्यार्थीनी सर्वगुणसंपन्न बनण्याचे आवाहन केले.

उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर उबाळे यांनी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी निर्माण केलेल्या सुविधांचा उल्लेख करून, प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करून आपल्या आईवडींलांचे , संस्थेचे नाव उज्वल करावे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी कु. श्रुती पळसकर, कु. रेणुका अंबिलवादे, कु. प्रतीक्षा मस्कर, आदित्य खोरे, कु. सदब शेख, कु. महेक शेख, कु. काजल दहिफळे, कु. वैष्णवी जाधव, कु. लक्ष्मी काळे, कु. स्वाती रंधे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना आपल्या महाविद्यालयाचे आणि शिक्षकांनी उत्कृष्ठ मार्गदर्शन केल्यामुळे त्यांच्याप्रती आदरभाव व्यक्त करून आभार मानले. याप्रसंगी प्रा.डॉ.दिगंबर दाते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात सामान्य ज्ञान परीक्षेतील गुणवंत आणि क्रीडा क्षेत्रातील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे संचलन प्रा. साईनाथ वाजे यांनी तर आभार प्रा. शीतल पालकर यांनी मानले. याप्रसंगी सर्व शाखेचे विद्यार्थी व प्रा.डॉ.प्रशांत तोर, प्रा. दिलीप जाधव, प्रा.डॉ.विद्या भिल्लारे,प्रा.रविंद तिकांडे, प्रा. संपत पवार, प्रा. कृष्णा परमेश्वर, प्रा. राजू पठाडे, प्रा. अनिता वाघ, प्रा. विशाल खरात, प्रा. शकील शेख, प्रा. मनोज भोसले, प्रा. अमोल अकोलकर, प्रा. पल्लवी दारवंटे, प्रा. मनोज हिवाळे, प्रा.राजू पवार प्रा. रतन गांगोडे, प्रा. तृप्ती कर्दळे, प्रा. अजहर चौगुले, प्रा.अश्विनी थोरे, प्रा.कृष्णा गंगाधरे, प्रा.सलीम शेख, त्र्यंबक आव्हाड, नारायण सोलाट,सुदाम पिंगळे, अरूण लांडगे, मच्छिंद्र गुंजाळ, सुनिल सोनवणे, जनार्धन आढे इत्यादी उपस्थित होते.

---

# गूढ आवाज़ाने भिंती थरथरल्या, नागरिकांमध्ये एकच खळबळ

धाराशिव । प्रतिनिधी

शहरासह संपूर्ण जिल्ह्यात बुधवारी (दि. ४) सकाळी दोन वेळा गूढ आणि प्रचंड आवाज झाल्याने नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. सकाळी ९.२३ वाजता आणि त्यानंतर अवघ्या दहा मिनिटांत ९.३३ वाजता हे आवाज ऐकू आले.

या आवाजामुळे अनेक घरांच्या खिडक्या हादरल्या, तर काही ठिकाणी घरातील भांडीही थरथरली. अचानक झालेल्या या घटनेमुळे अनेकांना १९९३ च्या भूकंपाची आठवण झाली. या गूढ आवाजानंतर नागरिकांनी एकमेकांना फोन करून आवाज झाल्याची खात्री केली. कळंब, भूम, वाशी, धाराशिव आदी तालुक्यांमध्ये या आवाजाची तीव्रता अधिक असल्याचे नागरिकांनी सांगितले. दरम्यान, सोशल मीडियावर पुन्हा एकदा जुन्याच आशयाचे संदेश व्हायरल झाले आहेत.

## जाहीर प्रगटन

### मा.श्री. व्ही.सी. जोशी, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २१४/२०२६, ॲड. ए.ए. हसेगावकर यांच्यामार्फत नरेंद्रसिंह पि. मदनसिंह परदेशी वि. निरंक ज्यापेक्षा सागरबाई भ्र. मदनसिंग परदेशी हे दिनांक २१.११.२००३ रोजी राहते घरी पिंपळनेर, ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार

१. नरेंद्रसिंह पि. मदनसिंह परदेशी, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. दत्त मंदिर गल्ली, पिंपळनेर, ता.जि. बीड, २. मनिषा भ्र. करणसिंग राजपूत, वय ४५ वर्षे, धंदा नौकरी, रा. घर नं. १-५-३०२, शिक्षक कॉलनी, एस.टी. स्टॅण्डच्या मागे, बी.एस.एन.एल. ऑफिसजवळ, बीड, ता.जि. बीड, ३. योगीता भ्र. अमोलसिंह राजपूत, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. ४-११७८/१, आदर्श कॉलनी, हिंगोली, ता. जि. हिंगोली, ४. स्मीता पि. मदनसिंग परदेशी उर्फ स्मीता भ्र. योगेशसींग परदेशी, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. काल्डा कॉर्नरचे जवळ, बी/३, सौजन्य नगर, औरंगाबाद, ता. जि. ओरंगाबाद, ५. रोशनी पि. मदनसिंह परदेशी उर्फ रोशनी भ्र. अशोकसींग परदेशी, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. दत्त मंदिर गल्ली, पिंपळनेर, ता.जि. बीड, ६. मदनसिंग पि. धरमसिंग परदेशी, वय ७७ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे.

अर्जदार क्रं. १ हा मयत सागरबाई भ्र. मदनसिंग परदेशी यांचा मुलगा असून, अर्जदार क्रं. २ ते ५ हया मयताच्या विवाहीत मुली आणि अर्जदार क्रं. ६ हे मयताचे पती आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत सागरबाई भ्र. मदनसिंग परदेशी यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख १६/०३/२०२६ आहे.

आज दिनांक ०४ फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरीत
क. लिपीक

आदेशावरुन
स्वाक्षरीत/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

---

# प्रा.अंनिस शेख यांची लॅक्रोस क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी



पाटोदा। प्रतिनिधी

वसंतदादा पाटील महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे प्रा.अंनिस शेख यांनी रियाध ( सौदी अरेबिया ) येथे पार पडलेल्या लॅक्रोस या आंतरराष्ट्रीय सांघिक क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून विजय मिळवला आहे.

सदरील स्पर्धा हि १ फेब्रवारी ते ४ फेब्रवारी २०२६ दरम्यान पार पडली. प्रा.अंनिश शेख हे वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत.प्रा शेख अंनिस व त्यांच्या टिमने पाकिस्तान विरुद्ध दमदार कामगिरी करून ७/१२ असा विजय मिळवला.त्यांच्या या कामगिरीबद्दल नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेशजी क्षीरसागर,डॉ सारिकाताई क्षीरसागर,डॉ दीपाताई क्षीरसागर, डॉ. विश्वंबर देशमाने , प्रा.डॉ.सुधाकर गुट्टे,प्राचार्य डॉ बळीराम राख, उपप्राचार्य डॉ.अभय क्षीरसागर, कनिष्ठ उपप्राचार्य नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा.अनिल जोगदंड, श्री अशोक पवार,डॉ.गायकवाड शिवानंद, प्रा.अशोक नागरगोजे, प्रा गणेश देशमाने, प्रा गोकुळ कंठाळे यांनी अभिनंदन केले.


---

# पहिले मराठी वैद्यकीय साहित्य-संस्कृती संमेलन छत्रपती संभाजीनगरात

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

डॉक्टरांमध्ये लपलेल्या साहित्यिक, सांस्कृतिक आणि सर्जनशील अभिव्यक्तीसाठी राष्ट्रीय व्यासपीठ उभे राहावे यासाठी आयएमएच्या वतीने पहिले भारतीय वैद्यकीय साहित्य-संस्कृती संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. १४ व १५ फेब्रुवारी असे दोन दिवस शहरातील एमआयटी कॉलेज येथे हे संमलेन होणार असल्याची माहिती आयएमएचे अध्यक्ष तथा संमलेनाचे स्वागताध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी संमेलन कार्याध्यक्ष डॉ. शहाजी तौर, डॉ. यशवंत गाडे, डॉ. अमोल देशमुख व डॉ. ऊर्मिला चाकूरकर यांची उपस्थिती होती. डॉ. शहाजी तौर म्हणाले, संमलेनाचे उद्घाटन कादंबरीकार विश्वास पाटील यांच्या



हस्ते आणि पद्मश्री डॉ. जब्बार पटेल यांच्या उपस्थित होणार असून, या निमित्ताने वैद्यकीय क्षेत्र आणि मराठी साहित्य-संस्कृती यांचा समृद्ध संगम अनुभवता येणार आहे. पहिल्या दिवशी सकाळी १० ते १२ या वेळेत विद्यार्थी, पालकांमध्ये आरोग्य जागृतीसाठी सप्तरंग आरोग्याचे, चित्रकला स्पर्धा माझा डब्बा माझा मित्र, निबंध स्पर्धा फास्ट फूड, शाप की वरदान, वक्तृत्व स्पर्धा यांसह ग्रंथदिंडीचे आयोजन केले आहे. शब्द पल्लवी, ललित लेख संमेलन, गझल ए इश्क मराठी गझल आणि कवी संमेलन तसेच सायंकाळी माकडाच्या हाती शॅम्पेन या नाटिकेचे सादरीकरण होईल. दुसऱ्या दिवशी लेखक मंगेश होडोळे, लेखक अरविंद जगताप यांची मुलाखत होईल. वैद्यकीय क्षेत्रातील नवरत्नांसोबत परिसंवाद होणार आहे. संमेलनस्थळी ग्रंथदालन, कलादालन, वस्त्रालंकार दालन, खाऊगल्ली यासारख्या विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर, साहित्यिक, विद्यार्थी आणि मराठीप्रेमी नागरिकांनी या अभिनव संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले असून, मोफत नोंदणीसाठी लिंक दिली आहे.

---

# शिर्डीत भाविकांचे दागिने चोरणारा श्रीरामपूरचा सराईत गुन्हेगार एलसीबीच्या जाळ्यात

अहिल्यानगर । प्रतिनिधी

साईनगरीत दर्शनासाठी येणार्या भाविकांच्या सुरक्षिततेवर डल्ला मारणार्या एका अट्टल आणि रेकॉर्डवरील गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेने अत्यंत फिल्मी स्टाईलने बेड्या ठोकल्या आहेत. तामिळनाडूमध्ये दरोड्याच्या गुन्ह्यात तब्बल सात वर्षे तुरुंगवास भोगून आलेल्या विकास उर्फ राहुल गोडाजी चव्हाण या सराईत चोरट्याला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून ७ चैन स्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी या कारवाईत अडीच लाख रुपये किमतीची सोन्याची लगड आणि गुन्ह्यात वापरलेली यामाहा मोटारसायकल हस्तगत केली आहे. साईनगरीत दहशत निर्माण करणार्या या टोळीचा मुख्य सूत्रधार आता पोलिसांच्या कोठडीत आहे.

धारवाड येथील एका भाविक कुटुंबातील महिलेच्या गळ्यातून पहाटेच्या सुमारास ११२ ग्रॅम सोन्याचे दागिने बळजबरीने हिसकावून नेल्यानंतर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या गुन्ह्याचा छडा लावण्याचे आदेश



स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. एलसीबीचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या पथकाने तांत्रिक कौशल्य आणि गुप्त बातमीदारांचे जाळे पसरवून माहिती काढली असता, श्रीरामपूरच्या अशोकनगर परिसरातील विकास चव्हाण यानेच आपल्या साथीदारासह हा धुमाकूळ घातल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी सापळा रचून विकासला ताब्यात घेतले. त्याने शिर्डीसह राहाता, संगमनेर आणि नाशिक जिल्ह्यातील सिन्नर परिसरात चैन स्नॅचिंग केल्याची कबुली दिली. या गुन्हेगाराचा क्राईम ग्राफ अत्यंत धक्कादायक असून, त्याने २००९ ते २०१६ या काळात तामिळनाडूमध्ये दरोड्याच्या गुन्ह्याची शिक्षा भोगली आहे. बाहेर आल्यानंतर त्याने पुन्हा राहुरी, कोपरगाव, श्रीरामपूर आणि तोफखाना पोलीस स्टेशनच्या हद्दीत जबरी चोर्यांचा सपाटा लावला होता. सध्या या गुन्ह्यातील त्याचे दोन साथीदार गणेश चव्हाण आणि राखी चव्हाण हे फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. या धडाकेबाज कारवाईमुळे शिर्डीत येणार्या भाविकांमध्ये काहीसा दिलासा मिळाला आहे. अट्टल गुन्हेगारांना पोलिसांनी दिलेला हा जबरदस्त दणका मानला जात आहे.

---

# धक्कादायक! काका व चुलत भावाकडून तरुणाची हत्या

अहिल्यानगर । प्रतिनिधी

सोनई-कांगोणी रस्त्यावरील वडघुले वस्ती येथे मंगळवार ३ फेब्रुवारी रोजी रात्री जुन्या घरी आल्याच्या कारणावरून चुलता व चुलत भावांनी भावाची हत्या केल्याची घटना घडली. या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेश दत्तात्रय वडघुले (वय ३६) रा. वडघुले वस्ती, कांगोणी रोड, सोनई हा जुन्या घरी आल्याच्या कारणावरून आरोपींनी कोयता, लोखंडी पाईप, शेतीसाठी लागणारे खोरे व लाकडी ठोकळ्याने डोक्यात मारले. यात गणेश वडघुले हा ठार झाला.

फिर्यादी हे त्यांचे भांडण सोडवण्यासाठी गेले असता आरोपींनी त्यांनाही मारहाण करून जखमी केले असल्याची फिर्याद हिराबाई दत्तात्रय वडघुले (वय ६०) रा. वडघुले वस्ती यांनी सोनई पोलीस ठाण्यात दिली. हिराबाई दत्तात्रय वडघुले यांच्या फिर्यादीवरुन पोलिसांनी विठ्ठल रंगनाथ वडघुले, भगवान विठ्ठल वडघुले, संभाजी विठ्ठल वडघुले, गौरी भगवान वडघुले सर्व रा. कांगोणी रोड, सोनई यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), ११८(१), ११५(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी सर्व आरोपींना ताब्यात घेतले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुरज मेढे पुढील तपास करत आहे. दरम्यान काल आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने विठ्ठल वडघुले, भगवान वडघुले, संभाजी वडघुले यांना दोन दिवस पोलीस कोठडी तर गौरी वडघुले हिस न्यायालयीन कोठडी देण्यात आली.

# केंद्र आणि राज्याचे एकत्रित एक हजार कोटी यात तर बुलेट ट्रेन येईल पण ....



बीड । प्रतिनिधी

**अहिल्यानगर बीड परळी या नियोजित रेल्वे मार्गासाठी नुकत्याच संसदेत जाहीर झालेल्या अर्थसंकल्पामध्ये ४९५७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे केंद्राने राज्य शासनाच्या ५०% निधी दिला तर ९९१४ कोटी रुपये या मार्गासाठी मिळत आहेत यात तर बुलेट ट्रेन येईल परंतु ती नको किमान अर्धवट राहिलेले काम पूर्ण व्हावे व रेल्वे नियमित सुरू व्हावी अशीच बीड करांची अपेक्षा आहे.**

अहिल्यानगर बीड परळी या नियोजित रेल्वे मार्गासाठी १९८५ पासून लढा सुरू आहे २०२५ पर्यंत बीड पर्यंत रेल्वेचे काम पूर्ण झाले यावर रेल्वेही धावत आहे आता वडवणी पर्यंतचे काम देखील पूर्ण झाले आहे याला गती देण्याचे गरज आहे आता केवळ वडवणी ते परळी या मार्गाचे ही काम जलद गतीने सुरू असून विद्युतीकरणाचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू आहे निधी अभावी प्रकल्प रखडला जाऊ नये यासाठी मोठे प्रयत्न केंद्र सरकारकडूनच केली जात आहे यातच काल नुकताच लोकसभेमध्ये सादर झालेल्या अर्थसंकल्पामध्ये अहिल्यानगर बीड परळी या रेल्वे मार्गासाठी ४९५७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे ही आनंदाची बाब आहे बीडच्या लोकप्रतिनिधींना निधीचा आकडा माहित नसला तरी तो शेजारच्या माजी लोकप्रतिनिधींनी सांगितला हा मार्ग पूर्ण होण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन अर्धा अर्धा खर्च करणार असल्याचे मागेच जाहीर झाले त्यानुसार हा खर्चही झाला आता केंद्र सरकारचे ४९५७ कोटी मिळाले तर ९९१४ कोटी रुपये या मार्गासाठी उपलब्ध होत आहेत त्यामधून भूसंपादन आणि इतर कामे होतीलच पण यासाठी गती देण्याची गरज आहे एवढ्या मोठ्या रकमेत बीडला बुलेट ट्रेन येऊ शकेल पण बुलेट ट्रेन नको नियोजित आहे तीच अहिल्यानगर बीड परळी ही रेल्वे नियमित सुरू व्हावी अशीच अपेक्षा जिल्हा वाशियांची आहे या मार्गावरील तोळ भूसंपादनाचा विषय सोडला तर पूर्ण काम झालेले आहे विशेष म्हणजे रेल्वे स्थानकाचे पूर्ण काम झाले असून वडवणी ते परळी या रेल्वे मार्गाला गती देऊन यावरून रेल्वेचे इंजिन धावणे गरजेचे आहे विशेष म्हणजे केवळ ट्रायल नव्हे तर नियमित रेल्वे सुरू झाली तर जिल्ह्याच्या विकासालाही गती मिळेल आता निधीची कमतरता पडणार नाही या रेल्वे मार्गाचा खर्च जरी वाढला असला तरी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाल्यामुळे कामाला गती देणे हे जिल्हा प्रशासनाचे काम आहे आणि ते लवकरात लवकर पूर्ण व्हावे हीच अपेक्षा जनता व्यक्त करीत आहे.

## स्व.अजित दादांचा शब्द खरा होणार का

बीड जिल्ह्याचे तात्कालीन पालकमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांनी बीड येथील एका कार्यक्रमांमध्ये मार्च अखेर परळी पर्यंतचे काम पूर्ण होईल आणि रेल्वे धावेल असा शब्द दिला होता त्यामुळे त्यांनी दिलेला शब्द मार्चपर्यंत पूर्ण होणार का? जर झाला तर ती त्यांना जिल्हा वाशी यांच्या वतीने खरी श्रद्धांजली ठरेल

# मनरेगातील कंत्राटी कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या आंदोलनाला बदामराव पंडितांचा पाठिंबा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ना.पंकजाताई मुंडे, ना.भरत गोगावलेंना निवेदन

गेवराई । प्रतिनिधी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी ( एम आर इ जी एस ) योजनेअंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी व अधिकारी यांनी मुंबईत आझाद मैदानावर सुरू केलेल्या आंदोलनास भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी जाहीर पाठिंबा दिला असून त्यांच्या मागण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास व महिला बालकल्याण मंत्री मंत्री पंकजाताई मुंडे आणि रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांना निवेदन देऊन, याबाबत योग्य





निर्णय घ्यावा अशी विनंती आपण करणार असल्याचे आश्वासन त्यांनी आंदोलकांना दिले आहे.

मनरेगा योजनेअंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी व अधिकारी हे मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन करत आहेत या आंदोलनाला भाजपने ते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी पाठिंबा दिला आहे. या आंदोलकांच्या मागण्याबाबत माजी मंत्री बदामराव पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पर्यावरण व महिला बालकल्याण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे आणि रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांना निवेदन दिले आहे या निवेदनात बदामराव पंडित यांनी म्हटले आहे की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामीण व दुर्बळ घटकांचा ◀◀ पान ३ वर

# उपमुख्यमंत्री अजित दादांच्या आठवणी जनतेच्या मनात सदैव जिवंत राहतील –आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

वेगाला हरवणारा माणूस आज वेगाशीच एकरूप झाला या भावनेतून राज्याचे लोकप्रिय लोकनेते उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या अस्थींचे दि ०६ फेब्रुवारी शुक्रवार रोजी सकाळी १०:०० वाजता दक्षिण काशी समजल्या जाणाऱ्या मंजरथ येथील गोदावरी नदीत जड अंतःकरणाने विसर्जन करण्यात आले.

कल्पनेपलीकडची ही दुर्दैवी घटना आजही मनाला स्वीकारणे कठीण जात आहे.मात्र नियतीने क्रूर थट्टा करत महाराष्ट्रावर ही कठीण वेळ आणली आहे.अस्थी विसर्जनाच्या वेळी उपस्थित सर्वांच्या डोळ्यांत





**दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादा पवारांच्या अस्थींचे दक्षिण काशी समजल्या जाणाऱ्या मंजरथ येथील गोदावरी नदीपात्रात विसर्जन**


अश्रू होते आणि वातावरण शोकमय झाले होते.दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादा पवारांचा वेग,त्यांची अपार ऊर्जा,निर्णयक्षमता आणि जनतेसाठी केलेले कार्य सदैव स्मरणात राहणार आहे.राज्याच्या विकासासाठी त्यांनी घेतलेले धाडसी निर्णय आणि जनतेशी असलेली त्यांची थेट नाळ कायम मार्गदर्शक ठरणारी आहे.उपमुख्यमंत्री अजित दादांच्या आठवणी जनतेच्या मनात सदैव जिवंत राहतील,अशा भावना यावेळी आमदार प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केल्या. याप्रसंगी जयसिंह सोळंके, वडवणीचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप,माजलगावचे उपनगराध्यक्ष सहाल चाऊस,राजेंद्र आनंदगावकर, बजरंग साबळे, संभाजी शेजुळ,अमोल जगताप, अर्जुन नाईकनवरे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत आज शुक्रवार,दिनांक ६ फेब्रुवारी रोजी दक्षिण काशी समजल्या जाणाऱ्या मंजरथ येथील गोदावरी नदी पात्रात अत्यंत जड अंतःकरणाने दादांच्या अस्थींचे विसर्जन करण्यात आले.

# जिल्हा रस्ता सुरक्षा समितीवर किशोर हंबर्ड यांची अशासकीय सदस्य म्हणून निवड

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी–रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करून वाहतूक सुरक्षितता वाढविण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा रस्ता सुरक्षा समितीवर श्री. किशोर बन्सीधर हंबर्ड यांची अशासकीय सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

सदर निवड भारत सरकारच्या सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग (राष्ट्रीय महामार्ग) तसेच बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार व जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष मा. खा. बजरंग मनोहर सोनवणे यांच्या



पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने करण्यात आली आहे.

रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या नियमित बैठका घेणे, अपघात प्रवण ठिकाणांचा आढावा घेणे तसेच प्रभावी उपाययोजना राबविण्यासाठी अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येते. त्याच अनुषंगाने मा. खासदार बजरंग सोनवणे यांनी त्यांच्या अधिकारानुसार एका अशासकीय सदस्याचे नामनिर्देशन केले असून, त्यानुसार श्री. किशोर हंबर्ड यांचा समितीत समावेश करण्यात आला आहे.

श्री. हंबर्ड यांच्या निवडीमुळे जिल्ह्यातील रस्ता सुरक्षा विषयक कामकाजास चालना मिळेल, तसेच अपघात रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.त्यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



# विठ्ठल महाराजांनी केली वामनभाऊ नारळी सप्ताहाच्या जागेची पाहणी

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील म्हसोबाची वाडी येथे दि.२ एप्रिल रोजी होणाऱ्या संत वामन भाऊ यांनी प्रारंभ केलेला ९४ वा नारळी सप्ताह सोहळा संपन्न होतं असुन गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत ह भ प विठ्ठल महाराज यांनी मौजे म्हसोबाची वाडी येथे येऊन जागेची दि .६ फेब्रुवारी रोजी पुर्वपाहाणी केली. या शुभ प्रसंगी म्हसोबाची वाडी व सेवालाल तांडा ग्रुप ग्रामपंचायतचे युवा सरपंच अन् सर्व ग्रामपंचायत सदस्य,व सर्व म्हसोबाची वाडी ग्रामस्थ सह पत्रकार बांधव उपस्थित होते.

# इस्त्रो भेटीसाठी विद्यार्थीनींच्या निवडीबद्दल सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील रामनगर येथील माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थीनी धनश्री इंगळे हिची इस्त्रो या अंतराळ संशोधन संस्थेला भेट देण्यासाठी निवड झाली असून या निवडीबद्दल गावकऱ्यांच्या वतीने दि ०६ फेब्रुवारी शुक्रवार रोजी सत्कार करण्यात आला.

इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित विजाभज निवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधनाबद्दल अधिक माहिती मिळावी, या क्षेत्रात स्वारस्य निर्माण व्हावे तसेच विद्यार्थ्यांना खडठज ची यशोगाथा आणि विज्ञान जागृत करण्याची संधी मिळावी म्हणून राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील



एकूण १०० विद्यार्थ्यांना खडठज (भारतीय अंतराळ संशोधन संस्था) या संस्थेस भेट आयोजित करण्याच्या अनुषंगाने मान्यता दिली असून त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागातील विजाभज आश्रमशाळांतील एकूण १०० विद्यार्थ्यांना खडठज (भारतीय अंतराळ संशोधन संस्था) या संस्थेस भेट देण्याची संधी मिळणार आहे, या विद्यार्थ्यांमध्ये छोटेवाडी येथील धनश्री दत्ता इंगळे या विद्यार्थिनीचा निवड करण्यात आली.

निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांच्यावतीने सत्कार करण्यात आला, शयाप्रसंगी सरपंच अंगदराव कटके, उपसरपंच बाळासाहेब चव्हाण, आश्रम शाळेचे शिक्षक राजाराम जंजाळ सर ,वैजनाथ कटके, दिलीप राठोड ,चेअरमन सतीश राठोड ,कैलास सोळंके,विपुल वैद्य,बाळासाहेब कटके,संदीप सोळंके,सुभाष सोळंके, राधाकिसन इंगळे ,अंकुश इंगळे, अमोल इंगळे ,राजेभाऊ अब्दुल ,संतोष दळवी,संतोष इंगळे ,भागवत इंगळे,महादेव उघडे,शिवाजी कटके ,सुग्रीव सोळंके यांची उपस्थिती होती.

# घरफोडी प्रकरणात शेजारीच निघाला चोर चोरट्यांकडून सहा लाखाचा ऐवज जप्त

बीड । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील बाराभाई गल्लीत दिनांक ३० जानेवारी रोजी घरफोडी करून अकरा लाखाचा ऐवज लुटून नेला होता. या प्रकरणात दोघांना अटक केली असून त्यातील एक बार भाई गल्लीतीलच रहिवासी असून शेजाऱ्यांनी या घरावर डल्ला मारला असे स्पष्ट झाले आहे.

पोलिस स्टेशन अंबाजोगाई शहर गुन्हा रजिस्टर नंबर ३४/२०२६ कलम ३३१(४), ३०५,



११२, ३(५)

भारतीय न्याय संहिता २०२३ मध्ये केलेली कार्यवाही


दिनांक ३०/०१/२०२६ रोजी फिर्यादी नामे काझी मोहम्मद अलीमुद्दीन करीमुद्दीन वय ६५ वर्षे, व्यवसाय व्यापार, रा. ए. पी. जी. पार्क शादीखाना शेजारी बाराभाई गल्ली अंबाजेगाई यांनी फिर्याद दिली कि, दिनांक २९/०१/२०२६ रोजी चे रात्री दरम्यान अंदाजे ०१:२५ वाजण्याच्या दरम्यान त्याचे ◀◀ पान ३ वर

# पत्रकारांसाठी ई-शिवाई बसमध्ये सवलत लागू करण्याची परिवहन मंत्र्यांकडे मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्य परिवहन महामंडळाच्या ई-शिवाई बससेवेत सर्वसामान्य प्रवाशांना विविध प्रकारच्या सवलती दिल्या जात असताना लोकशाहीचा चौथा खांब मानल्या जाणाऱ्या अधिस्वीकृत पत्रकारांना मात्र या सवलतींपासून वंचित ठेवण्यात आले आहे. ही बाब अत्यंत खेदजनक असून पत्रकारांवर अन्याय करणारी असल्याचे मत मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक व ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय आंबेकर यांनी व्यक्त करत पत्रकारा साठी ही सवलत तात्काळ लागू करावी अशी मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या कडे केली आहे.

पत्रकार समाजातील घडामोडी जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी अहोरात्र कार्यरत असतात.



ग्रामीण व दुर्गम भागात बातमी संकलनासाठी प्रवास करणे पत्रकारांना अपरिहार्य असते. अशा परिस्थितीत ई-शिवाई बससेवेत अधिस्वीकृत पत्रकारांना सवलत देणे अत्यंत आवश्यक आहे. ई शिवाई बसेस मध्ये महामंडळाने दिलेल्या सवलती नुसार महिला, वयोवृद्ध या सह अन्य नागरिकांना सवलत देण्यात येते मात्र जनतेच्या प्रश्नाला वाचा फोडणाऱ्या पत्रकारांना या बसेस मध्ये सवलत दिल्या जात नाही. नेट वर सर्च केले तर मोफत सवलती मध्ये अधिस्वीकृती पत्रकारांना मोफत सवलत दाखवल्या जाते मात्र प्रत्यक्षात ही सवलत दिल्या जात नाही. याबाबत राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तात्काळ लक्ष घालून अधिस्वीकृत पत्रकारांना ई-शिवाई बससेवेत सवलत लागू करण्याचे आदेश द्यावेत, अशी ठाम मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या कडे केली आहे. पत्रकारांवरील हा अन्याय दूर न झाल्यास पत्रकार संघटना तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबतील, असा इशाराही यावेळी देण्यात आल आहे.

# सोलापूरचे ३३ काळविट नैसर्गिक अधिवासात सोडले

## 'अंबाजोगाई ग्रासलॅड सफारी' चा शुभारंभ

बीड । प्रतिनिधी

बीड वन विभागांतर्गत वनपरिक्षेत्र कार्यालय परळी मध्ये जैवविविधता संवर्धन व रोजगार निर्मिती या उद्देशाच्या अनुषंगाने अंबाजोगाई शहरालगत असलेल्या वन विभागाच्या डोंगराळ, खुरट्या व गवताळ वनक्षेत्रात "अंबाजोगाई ग्रॅसलँड सफारी" या उपक्रमाची दिनांक २६. १. २०२६ रोजी विधानसभेच्या सदस्या नमिता मुंदडा अंबाजोगाई, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,



अंबाजोगाई नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, विभागीय वनाधिकारी अमोल गरकळ, विभागीय अधिकारी सामाजिक वनीकरण श्रीनिवास लखमावार, अंबाजोगाई उपविभागीय अधिकारी दीपक वांजळे, अंबाजोगाई तहसीलदार विलास तरांगे यांच्या हस्ते शुभारंभ झाला. यावेळी वनक्षेत्रात महात्मा गांधी प्राणी संग्रहालय सोलापूर येथील ३३ काळवीट जातीच्या हरणास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

परळी वनपरिक्षेत्रा अंतर्गत अंबाजोगाई शहरालगत वन विभागाचे एकूण १३२८.०६ हे.आर सलग राखीव नक्षत्र आहे. सदरचे क्षेत्र हे डोंगराळ खुरट्या व गवताळ प्रकारचे आहे यामध्ये विविध प्रकारचे वन्यप्राणी जसे की हरिण, लांडगा, कोल्हा, बीबट, तडस इत्यादी प्राण्यांचा तसेच विविध प्रकारच्या पक्षांचा अधिवास मोठ्या प्रमाणावर आहे. तसेच या क्षेत्रामधून वाणा नदीचा प्रवाह वाहत असल्यामुळे वन्य प्राणी व पक्षांना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था या ठिकाणी आहे. तसेच अंबाजोगाईच्या मुकुंदराज परिसराला निसर्गाची देण आहे.

दऱ्या- खोऱ्याने नटलेल्या या परिसरात निसर्ग सौंदर्याचे वैभव दाटलेले आहे. त्यात वनराई फुलण्याची गरज आहे. या परिसराला ऐतिहासिक महत्त्व असून सदरचे ठिकाण हे पर्यटनाच्या दृष्टीने योग्य असल्याने निसर्गरम्य परिसरात पर्यटनाच्या दृष्टीने ◀◀ पान ३ वर

# संत श्री गजानन महाराज मंदिरात प्रगट दिनानिमित्त धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

बीड प्रतिनिधी

शहरातील सहयोग नगर भागामध्ये असलेल्या संत श्री गजानन महाराज मंदिरात प्रगट दिनानिमित्त सोमवार दि. २ फेब्रुवारीपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिराचे हे रौप्य महोत्सवी वर्ष असल्यामुळे दररोज भक्तिमय वातावरणात बहारदार कार्यक्रम पार पडत असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या निमित्ताने गजानन महाराज पारायण सोहळा, भजन-कीर्तन,



नामस्मरण, हळदीकुंकू कार्यक्रम, तसेच विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भक्तांच्या वतीने अन्नदान सेवा राबविण्यात येत असून मोठ्या संख्येने भाविक प्रसादाचा लाभ घेत आहेत.

गुरुवार दि. ५ फेब्रुवारी रोजी केशव शंखनाद पथक, पुणे यांच्या वतीने शंखनाद व विशेष सेवा सादर करण्यात आली. या कार्यक्रमाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. मंदिर परिसरात भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

रविवार दि. ८ फेब्रुवारी रोजी प्रगट दिनाचा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून यावेळी महारुद्र अभिषेक, महापूजा तसेच ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शनिवार दि.७ फेब्रुवारी २०२६ । पान ७

# आचारसंहिता भंग प्रकरणी पुण्यातील चार सहकारी संस्थांना नोटीस

पुणे । प्रतिनिधी

**निवडणूक आचारसंहिता लागू असतानाही संस्थेच्या नावात बदल करून आदर्श आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी निवडणूक प्रशासनाकडून चार संस्थांना नोटीस काढण्यात आली आहे. त्यामध्ये येथील पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (कात्रज डेअरी), पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीसह बारामती तालुका सहकारी दूध संघ आणि बारामती खरेदी-विक्री संघ यांचा समावेश आहे.**




निवडणूक प्रशासनाकडून दुग्ध व्यवसाय विकास आणि सहकार विभागाच्या जिल्हा कार्यालयामार्फत विचारणा करण्यात आली आहे. गुरुवारी (दि. ५) संबंधित कार्यालयात चौकशीसाठी अधिकाऱ्यांचे पथके पोहोचताच खळबळ उडाल्याचे सांगण्यात आले. पुणे जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची आदर्श निवडणूक आचारसंहिता लागू आहे. असे असताना कात्रज दूध संघाने पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव देण्याची घोषणा केली. त्याचबरोबर ठराव करून नाव देण्याचा घेतलेला निर्णय, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने त्यांच्या फुलांच्या बाजाराला अजितदादांचे नाव देण्याची केलेली घोषणा, त्याचप्रमाणे बारामती तालुका सहकारी दूध संघ आणि बारामती खरेदी-विक्री संघ यांनीदेखील अजित पवार यांचे नाव देण्याची घोषणा करून या संबंधातील बातम्या संबंधित पदाधिकाऱ्यांनी जाहीर केल्या आहेत. हा आदर्श निवडणूक आचारसंहितेचा भंग असल्याने या प्रकरणी कारवाई सुरू केली आहे. वर्तमानपत्रांमध्ये आलेल्या बातम्या आणि प्रश्न अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांच्या निवडणूक विभागाकडून ही कारवाई करण्यात आली. संबंधित संस्थांकडून लेखी खुलासा तत्काळ सादर करून घेण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. पुणे विभागीय दुग्ध उपनिबंधक राजकुमार पाटील यांनी त्यांच्या अधिकाऱ्यांचे पथकामार्फत आज सायंकाळी कात्रज दूध संघात नोटीस बजावली व पथकाने चौकशी केली. तसेच, पुणे जिल्हा सहकार निबंधक (ग्रामीण) प्रकाश जगताप यांच्या कार्यालयाकडून पुणे कृषी बाजार समितीलादेखील नोटीस देण्यात आली. त्याचबरोबर बारामती येथील सहकारचे सहायक निबंधकामार्फत तालुका दूध संघ आणि तालुका खरेदी-विक्री संघ यांना नोटीस दिली आहे. याप्रकरणी तत्काळ खुलासा देण्यास सांगितले असून, संबंधित कागदपत्रांचे दस्तऐवज सादर करण्यास सांगितले आहे. सायंकाळपासून या संस्थांच्या कार्यालयामध्ये निवडणूक प्रशासनाकडून सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत ही कारवाई सुरू करण्यात आल्याची माहिती मिळाली.

# पुणे महापालिकेचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प १३ फेब्रुवारीला सादर होणार

**पुणे । प्रतिनिधी**

मनपाची पहिली सर्वसाधारण सभा ९ तारखेला होणार असून, या बैठकीत स्थायी समितीच्या अध्यक्षांची आणि इतर सदस्यांची निवड करण्यात येणार आहे. या समितीसमोर पुणे महापालिकेचा बहुप्रतीक्षित २०२६-२७ चा अर्थसंकल्प आयुक्त नवलकिशोर राम हे १३ फेबुवारी रोजी सादर करणार आहेत.




महापालिकेची निवडणूक नुकतीच पार पडली आहे. या निवडणुकीत भाजपचे ११९ नगरसेवक निवडून आले आहेत. महापौर व उपमहापौर निवडीसाठी ९ तारखेला महापालिकेची सर्वसाधारण सभा आयोजित केली असून, या सभेत या निवडी करण्यात येणार आहेत. भाजपने महापौरपदासाठी मंजूषा नागपुरे, तर उपमहापौर पदासाठी परशुराम वाडेकर यांचे नाव निश्चित केले आहे. भाजपचे सभागृहात मोठे संख्याबळ असल्याने दोघांची निवड निश्चित आहे. याच सभेत स्थायी समितीच्या अध्यक्षांची व इतर सदस्यांची निवड होणार आहे. १६ सदस्यीय समितीत भाजपचे १२, राकाँचे ३, तर काँग्रेसचा १ सदस्य असेल.

या स्थायी समितीसमोर १३ फेबुवारीला आयुक्त नवल किशोर राम त्यांचा पहिला अर्थसंकल्प सादर करणार आहे. सध्या अर्थसंकल्प तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. सर्व विभागाकडून गेल्या वर्षी झालेल्या खर्चाची, तसेच पुढच्या वर्षाची मागणी याची माहिती मागविण्यात आली आहे.

त्यानुसार भांडवली व महसुली खर्चावर अर्थसंकल्प सादर करण्यात येणार आहे. ४ वर्षानंतर सभागृहात हा अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे. भाजपच्या जाहीरनाम्यात अनेक घोषणा करण्यात आल्या असून, त्याची पूर्तता करण्यासाठी या अर्थसंकल्पांत तरतुदी केली जाण्याची शक्यता आहे.आयुक्तांनी अर्थसंकल्प सादर केल्यावर स्थायी समिती अध्यक्ष त्यात सुधारणा करतात आणि सर्वसाधारण सभेसमोर अर्थसंकल्प सादर करतात. ३१ मार्चपूर्वी सर्वसाधारण सभेने अर्थसंकल्पावर चर्चा करून मंजुरी देणे आवश्यक आहे. त्यानंतरच त्याची अंमलबजावणी करता येते. दरम्यान, आयुक्तांनी अर्थसंकल्प सादर करण्याची तयारी सुरू केली असून, सर्व विभागांकडून माहिती घेण्यात आली.

# पुणे बार असोसिएशनच्या खजिनदारपदी ॲड.अंजली बांदल यांचा विजय

पुणे । प्रतिनिधी

पुणे बार असोसिएशनच्या निवडणुकीत खजिनदारपदासाठी करडे गावच्या ॲड अंजली बांदल यांनी सर्वाधिक मताधिक्याने दणदणीत विजय मिळवला आहे. शिवाजीनगर येथील जिल्हा सत्र न्यायालयाच्या अशोका हॉलमध्ये बुधवारी (दि ४) फेब्रुवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. तर गुरुवारी (दि ५) फेब्रुवारी रोजी दुपारी एक वाजेपर्यंत मतमोजणी पुर्ण झाल्यानंतर अधिकृत निकाल जाहीर करण्यात आला.



या अत्यंत चुरशीच्या आणि लक्षवेधी निवडणुकीत ड अंजली बांदल यांनी प्रतिस्पर्धी उमेदवाराचा पराभव करत तब्बल ५,२७४ मते मिळवली. त्यांच्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा ३,२३९ मतांचे मोठे मताधिक्य मिळवत त्यांनी खजिनदारपदी निर्विवाद विजय संपादन केला. पुणे बार असोसिएशनच्या इतिहासातील सर्वाधिक मताधिक्यांपैकी हा एक विजय मानला जात असून, त्यांच्या यशाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. या निकालातून वकिल बांधवांनी ड बांदल यांच्या कार्यशैलीवर, पारदर्शकतेवर आणि नेतृत्वक्षमतेवर ठाम विश्वास व्यक्त केला असल्याची चर्चा बार असोसिएशनमध्ये होत आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान मोठ्या संख्येने वकिलांनी मतदानाचा हक्क बजावल्यामुळे लोकशाही प्रक्रियेबद्दल समाधान व्यक्त करण्यात येत आहे. ॲड बांदल यांच्या या विजयामुळे बार असोसिएशनच्या आर्थिक व्यवस्थापनात पारदर्शकता आणि शिस्तबद्ध कारभाराला अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा वकिल वर्गातून व्यक्त केली जात आहे.

# शेअर मार्केटच्या नावाखाली १.१९ कोटींचा चुना; ३ व्यक्तींना बसला मोठा फटका

पुणे । प्रतिनिधी

शेअर मार्केटमधील गुंतवणूक, स्टॉक खरेदीच्या बहाण्याने सायबर ठगांनी तिघांना १ कोटी १९ लाख २१ हजार रुपयांचा आर्थिक गंडा घातला आहे. याप्रकरणी सायबर ठगांच्या विरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.


पोरवाल रोड धानोरी येथील एका ५९ वर्षीय व्यक्तीने आपली फसवणूक झाल्याप्रकरणी सायबर पोलिसांत फिर्याद दिली आहे. स्टॉक खरेदी आणि त्यावर नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत सायबर ठगाने या व्यक्तीकडून ५० लाख रुपये उकळले आहेत,

तर दुसऱ्या घटनेत शेअर मार्केटमधील गुंतवणुकीवर चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत सायबर चोरट्यांनी बिबवेवाडी येथील ४७ वर्षीय व्यक्तीकडून ४२ लाख ६६ हजार रुपये उकळले आहेत. याप्रकरणी फसवणूक झालेल्या व्यक्तीने दिलेल्या फिर्यादीनुसार मार्केटयार्ड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.तिसऱ्या घटनेत देखील केसनंद येथील ३४ वर्षीय व्यक्तीची शेअर मार्केट गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याच्या बहाण्याने २६ लाख ५५ हजार रुपयांची फसवणूक सायबर चोरट्यांनी केली आहे. याप्रकरणी वाघोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# कुंभमेळ्यात श्रमदान अन् विद्यार्थ्यांना २ गुण; पुणे विद्यापीठाच्या निर्णयावरून पेटला नवा वाद

पुणे । प्रतिनिधी

नाशिक येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्यात श्रमदान करणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन क्रेडिट गुण (श्रेयांक) देण्याच्या निर्णयावरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. विद्यापीठाच्या या निर्णयाला विविध विद्यार्थी संघटनांनी कडाडून विरोध दर्शवला आहे. त्यामुळे पुणे विद्यापीठ पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.



नाशिक कुंभमेळ्यासारख्या मोठ्या सोहळ्यात व्यवस्थापन, शिस्त आणि सेवाभावाचे धडे विद्यार्थ्यांना मिळावेत, या उद्देशाने विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने श्रमदान करणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन श्रेयांक देण्याचा प्रस्ताव मंजूर केला होता. या निर्णयावर लवकरच अधिकृत शिक्कामोर्तब होणार आहे. मात्र, त्यापूर्वीच विद्यार्थी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

दरम्यान, शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून कुंभमेळ्यात सहभागी होण्याचे बंधन घालून धार्मिक प्रचार करू नये, असा आक्षेप संघटनांनी घेतला आहे.यासंदर्भात रिपब्लिकन विद्यार्थी सेनेच्या शिष्टमंडळाने कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांची भेट घेतली. यावेळी दोन श्रेयांक देण्याचा विषय हा पूर्णतः ऐच्छिक होता. मात्र, विद्यार्थी संघटनांनी उपस्थित केलेले मुद्दे लक्षात घेता, हा प्रस्ताव पुन्हा एकदा अधिकार मंडळासमोर ठेवून त्यावर सविस्तर फेरविचार केला जाणार असल्याचे आश्वासन विद्यापीठाने संघटनांना दिले आहे.

# सावित्रीबाईंच्या विचारांचा जागर! विभावरी देशपांडे, किशोरी पेडणेकरांना 'सावित्रीच्या लेकी' पुरस्कार प्रदान

पुणे

इंडियन स्टुडंट कौन्सिलच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त देण्यात येणारे 'सावित्रीच्या लेकी' आणि राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण उत्साहात पार पडले. या वर्षीचा राष्ट्रीय 'सावित्रीच्या लेकी' पुरस्कार अभिनेत्री विभावरी देशपांडे (सांस्कृतिक), मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर (राजकीय) आणि मध्य प्रदेशातील प्रा. डॉ. सरिता मालवीय (संशोधन) यांना प्रदान करण्यात आला.

तसेच, राजर्षी छ. शाहू महाराज राज्यस्तरीय पुरस्कार चिन्मयी सुमित, अनिल कलकुटकी आणि डॉ. जगन्नाथ गोपाळ यांना देण्यात आला. ज्येष्ठ अभिनेत्री सुषमा देशपांडे आणि कवी अरुण म्हात्रे यांच्या हस्ते हे पुरस्कार वितरित करण्यात आले.राज्यस्तरीय 'सावित्रीच्या लेकी' पुरस्काराने प्रा. डॉ. अरुणा वाघोले (संशोधन),



प्राची घाणेकर (पत्रकारिता), अस्मिता चांदणे (साहित्य), पल्लवी पुजारी (शिक्षण), वैशाली सावळे आणि करुणा विमल (सामाजिक) यांना सन्मानित केले गेले. यासोबतच 'साऊ-ज्योतिबा आदर्श लेखणी' आणि 'विशेष सावित्रीच्या लेकी' पुरस्कारांचेही वितरण झाले.पुरस्काराला उत्तर देताना चिन्मयी सुमित यांनी हा पुरस्कार जबाबदारीची जाणीव करून देणारा असल्याचे सांगत मराठी शाळांसाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. विभावरी देशपांडे यांनी सावित्रीबाईंच्या नावे पुरस्कार मिळणे हे भाग्य असल्याचे मानले, तर किशोरी पेडणेकर यांनी स्त्रियांना राजकारणात मिळालेल्या संधींचे श्रेय सावित्रीबाईंना दिले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सुषमा देशपांडे यांनी सावित्रीबाईंच्या विचारांचे नाट्य प्रयोग सादर करण्याच्या गरजेवर भर दिला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. ज्ञानोबा कदम यांनी प्रास्ताविक केले, तर कवी अरुण म्हात्रे यांनी 'उंच माझा झोका' हे शीर्षक गीत गाऊन कार्यक्रमाची सांगता केली. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रा. माधुरी राऊत, डॉ. माधवी महाके आणि अन्य सदस्यांनी परिश्रम घेतले.

# पुण्यात गावठी पिस्तुलांचा धंदा उघड! उमरटी कनेक्शन उघडकीस, टोळीचा पर्दाफाश

पुणे: पुण्यातील टोळीयुद्धात गावठी पिस्तुलांचा वाढता वापर पाहता पुणे शहर पोलिसांनी मध्य प्रदेशातील पिस्तूलनिर्मितीचे केंद्र असलेल्या उमरटी गावात धाड टाकली होती. त्यामुळे पुण्यात थेट उमरटीतून येणाऱ्या गावठी पिस्तुलांना गेल्या काही दिवसांत लगाम बसला होता. परंतु, चार दिवसांपूर्वी पुण्यातील एका सराईताने उमरटीतून चार गावठी पिस्तुले खरेदी करून पुण्यात आणली. याप्रकरणी दोघा सराईतांना गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी दोनच्या पथकाने बुधवारी (दि.४) रात्री शिवाजीनगर परिसरात पकडले. त्यांच्याकडून चार गावठी पिस्तुले आणि पाच जिवंत काडतुसे असा १ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



रोहित दुर्गेश धर्माधिकारी (२४, प्रियदर्शननगर, जुनी सांगवी, शेवट बसस्टॉप) आणि अभिषेक राजू टेंकल (२३, रा. विष्णूकृपानगर, जुने शिवाजीनगर बसस्टँड, शिवाजीनगर) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत.

दोघेही रेकॉर्डवरील गुन्हेगार असून, त्यांच्यावर यापूर्वीच बेकायदा अग्निशस्त्र बाळगल्याचे गुन्हे दाखल आहेत. बुधवारी रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास गुन्हे शाखेचे खंडणीविरोधी पथक शिवाजीनगर परिसरात गस्तीवर होते. त्यावेळी पोलिस अंमलदार सुरेंद्र जगदाळे, प्रशांत शिंदे यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली.

रेकॉर्डवरील आरोपी रोहित धर्माधिकारी हा शिवाजीनगर येथील ज्ञानेश्वर पादुका चौकात येणार असून, त्याच्याकडे गावठी पिस्तुले आहेत. त्यानुसार पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे, सहायक पोलिस आयुक्त राजेंद्र मुळीक, वरिष्ठ पोलिस निरीक्षक राम राजमाने यांच्या मार्गदर्शनात पीएसआय गौरव देव, कर्मचारी दिलीप गोरे, रवींद्र रोकडे, अनिल कुसाळकर, पवन भोसले, अमोल राऊत, गणेश खरात यांच्या पथकाने सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. चौकशी करून अंगझडती घेतली असता दोघांजवळ चार गावठी पिस्तुले आढळली. पोलिसांनी ती जप्त केली. आरोपी रोहित हा सराईत आहे. काही दिवसांपूर्वी त्याचा सांगवीत एकासोबत वाद झाला होता. त्यामुळे त्याने मध्य प्रदेशातील उमरटीतून गावठी पिस्तुले आणण्याची योजना आखली. त्यासाठी त्याने तळेगाव येथील सिद्धू नावाच्या मित्राला सोबत घेतले. चार दिवसांपूर्वी मोटारीतून हे दोघे उमरटी गावात पोहोचले. पुणे पोलिसांच्या कारवाईचा धसका तेथील गावठी पिस्तुले तयार करणाऱ्यांनी घेतला असल्यामुळे दोघे पिस्तुले घेण्यासाठी आल्याची खात्री पटल्यानंतर त्यांना गावातून ठरलेल्या ठिकाणी घेऊन गेले. तेथे या दोघांनी चार पिस्तुले विकत घेतली. त्यानंतर ते पुण्यात आले. चारपैकी एक पिस्तूल रोहितने आपला मित्र अभिषेकला दिले, तर तीन पिस्तुले आपल्याजवळ ठेवली, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# ११ वर्षांतील सर्वात मोठे सौरवादळ; पुण्यात दुर्बिणीतून सूर्यावरील डागांचे दर्शन

पुणे । प्रतिनिधी

सूर्यावरील वादळ गुरुवारी अवघ्या जगाने अनुभवले. ११ वर्षांनी यंदा सर्वात मोठे वादळ सुरू झाले आहे. त्याचा थरार दुर्बिणीच्या साहाय्याने शास्त्रज्ञांसह विद्यार्थांनी टिपला आहे. पुण्यातील केसरीवाड्यावरील दुर्बिणीतून मुलांनी सूर्यावरील मोठे डाग पाहिले. 'आदित्य एल-१' या उपग्राहामुळे यंदाच्या सौरवादळाची स्पष्ट छायाचित्रे टिपता आली.





फेबुवारीच्या पहिल्या आठवड्यात सूर्यावरील वादळे होणार असल्याचे भाकित शास्त्रज्ञांनी दिले होते. त्याप्रमाणे ५ फेबुवारी २०२६ रोजी दुपारी ४ ते ६ दरम्यान सूर्यावरील मोठे डाग विद्यार्थ्यांना दुर्बिणीतून पाहता आले, तर नासा, इस्रोतील शास्त्रज्ञांनी याची चित्रे टिपली. यंदा 'आदित्य एल-१' या सूर्यासाठी पाठवलेल्या उपग्राहाने या वादळाची अधिक स्पष्ट प्रतिमा टिपण्यात यश मिळवले. शास्त्रज्ञांनी या घटनेचे वर्णन आतापर्यंतचा सर्वात प्रबळ स्फोट असे केले असून, यातून बाहेर पडलेले ऊर्जावान कण पृथ्वीच्या दिशेने येत आहेत. ज्यामुळे उपग्राह, रेडिओ दळणवळण आणि पॉवर ग्रीडवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली आहे. सूर्यावरील डाग (सनस्पॉट) हा शास्त्रज्ञांच्या भाषेत सूर्याचा विभाग ४३६६ मधून हा स्फोट झाला. जो अत्यंत अस्थिर असल्याचे सांगण्यात येते.

**केसरीवाड्यावर भरली खगोलप्रेमींची शाळा**

पुण्यातील केसरीवाड्याच्या टेरेसवरील खगोल शाळेत ज्योतिर्विद्या परिसंस्थेच्या वतीने गुरुवारी दुपारी ४ ते सायंकाळी ६ पर्यंत दुर्बिणीच्या साहाय्याने सूर्याच्या पृष्ठभागावरील सौरडाग विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी विशेष आयोजन केले होते. विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांनी दुर्बिणीतून सौरडाग पाहण्यासाठी गर्दी केली होती.

# आजारी वृद्ध महिलेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या ५८ वर्षीय व्यक्तीला १० वर्षे सक्तमजुरी

**पुणे । प्रतिनिधी**

आजारी असलेल्या ७५ वर्षाच्या ज्येष्ठ महिलेला दवाखान्यात नेवून परत आणताना तोंडात रुमाल घालून बलात्कार करणाऱ्या ५८ वर्षीय व्यक्तीला १० वर्षे सक्तमजुरी आणि १२ हजार रुपये दंडाची शिक्षा न्यायालयाने सुनावली. विशेष न्यायाधीश एच.के. भालेराव यांनी हा आदेश दिला आहे. दंड न भरल्यास तीन महिने अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असे न्यायालयाने आदेशात म्हटले आहे. माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना सप्टेंबर २०१९ मध्ये घडली.

चंद्रकांत भिकू निबुरे (वय ५८, रा. मुळशी तालुका) असे त्याचे नाव आहे. याबाबत पीडितेने पौड पोलिसात फिर्याद दिली होती. सरकारी पक्षातर्फे विशेष सरकारी वकील संजय पवार यांनी ८ साक्षीदार तपासले. त्यांना जिल्हा न्यायालय पैरवी अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष घोळवे, सत्र न्यायाधीश पैरवी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक विद्याधर निचित, हवालदार अल्ताफ इनामदार, अकबर शेख यांनी न्यायालयीन कामकाजासाठी सहकार्य केले. ही घटना सप्टेंबर २०१९ मध्ये घडली. पीडित व आरोपी नात्यातील आहे. पीडित आजारी होती. त्यावेळी दवाखान्यात घेऊन गेला. परत येत असताना फिर्यादीच्या मुलाच्या अर्धवट बंधकामावर घेऊन गेला. तेथे फिर्यादीला जमिनीवर पाडून, धमकावून, फिर्यादी ओरडू नये, यासाठी तोंडात रुमाल घालून बलात्कार केला.

याबाबत कोणाला सांगू नको, असे म्हणून निघून गेला. फिर्यादी पायी घरी गेली. मुलाला घेऊन जाऊन पौड पोलिसात फिर्याद दिली. या प्रकरणी फिर्यादीच्या अंगावर जखमा झाल्या होत्या. त्यामुळे दाव्यात वैद्यकीय पुरावा महत्त्वाचा ठरला. हा गंभीर गुन्हा आहे. आरोपीला अधिकाधिक शिक्षा देण्याची मागणी सरकारी वकील संजय पवार यांनी केली.

# लोणावळ्याजवळ टँकर उलटला; २८६ प्रवाशांचे विमान अवघ्या १० मिनिटांत हुकले

मंचर । प्रतिनिधी

मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावर लोणावळ्याजवळ टँकर उलटल्याने वाहतूककोंडीत अडकलेल्या २८६ प्रवाशांनी रेल्वे, ओला करून मुंबई विमानतळ गाठले. चेक इन झाल्यानंतर केवळ दहा मिनिटे प्रवाशांना विलंब झाला. तोपर्यंत इंडिगो कंपनीच्या विमानाने उड्डाण केल्याने प्रवाशांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. याबाबत प्रवाशांनी तीव संताप व्यक्त केला.



या प्रवाशांनी ४ फेबुवारी रोजी पहाटे ५.२५ वाजताच्या मुंबई-अबुधाबी विमानाची तिकिटे काढली होती. त्यासाठी पुण्याहून दि. ३ रोजी सायंकाळी पाच वाजता ५० प्रवाशांचा गट मुंबईकडे निघाला. तसेच, इतर २३६ प्रवासी बसने मुंबईकडे निघाले. लोणावळ्याजवळ टँकर उलटल्याने महामार्गावर प्रचंड वाहतूककोंडी झाली. त्यात प्रवासी अडकले.

परिस्थिती लक्षात घेऊन प्रवाशांनी खंडाळ्याहून यू-टर्न घेत लोणावळा रेल्वे स्थानक गाठले. तेथून मध्यरात्री १२.४० च्या कोणार्क एक्सप्रेसची तिकिटे काढून प्रवास सुरू केला. परंतु, ही गाडीही सुमारे एक तास उशिराने धावली. वेळ वाचवण्यासाठी प्रवासी दादरऐवजी ठाणे स्थानकावर उतरले. ओला सेवेद्वारे एक हजार रुपये मोजून प्रवाशांनी धावपळ करत मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ गाठले.मात्र, चेक इन होईपर्यंत विमान उड्डाणाची वेळ झाली. केवळ दहा मिनिटांच्या विलंबामुळे जवळपास २८६ प्रवासी विमानात चढू शकले नाहीत. अवघे पन्नास प्रवासी घेऊन विमान उडाले. यामुळे प्रवाशांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले. शारीरिक-मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागले. वारंवार विनंती करूनही विमान कंपनीकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याची तक्रार प्रवाशांनी केली. विमानतळातून बाहेर निघताना तेथील पोलिस अधिकाऱ्यांनी आमची चौकशी करत आरोपींसारखी वागणूक दिल्याचा आरोप गिरवली(ता. आंबेगाव) येथील जुई पवन हगवणे आणि प्रवाशांनी केला. याबाबत नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.